बुधवार, १२ जुलै २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२९६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • WEDNESDAY 12 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-296 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

## कुठे पूर तर कुठे हुरहूर



यंदा पावसाने बळीराजाच्या प्रतीक्षेचा जणू अंतच पाहिला. महाराष्ट्रात तब्बल एक महिना उशिरा सुरू झालेला पाऊस अजूनही काही भागांत म्हणावा तसा बरसलाच नाही. तर काही भागांत दमदार पाऊस होत आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे भंडारा जिल्ह्यातील नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत. या पावसाने जिल्ह्यातील शेतकरी सुखावला आहे.

# सुप्रीम कोर्टाचा सरकारला दणका

## ईडी संचालकांची मुदतवाढ बेकायदेशीर

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली : केंद्र सरकारने अलीकडेच सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीचे संचालक संजय कुमार मिश्रा यांना तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली होती. या मुदतवाढीविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर न्यायालयाने केंद्र सरकारचा हा निर्णय अवैध ठरवला आहे. न्यायालयाने मंगळवारी संजय कुमार मिश्रा यांना तिसऱ्यांदा दिलेली मुदतवाढ अवैध ठरवली. मात्र, त्यांना ३१ जुलैपर्यंत पदावर कायम राहण्याची परवानगी दिली आहे.**



ही सुनावणी न्यायमूर्ती बी.आर. गवई, न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संजय करोल यांच्या खंडपीठापुढे पार पडली. यावेळी खंडपीठाने सांगितले की, चालू वर्षात फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्सद्वारे आढावा घेण्यासाठी आणि पदभार इतर अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यासाठी मिश्रा यांचा कार्यकाळ ३१ जुलैपर्यंत कायम असेल. मिश्रा यांना तिसऱ्यांदा दिलेल्या मुदतवाढीला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने मे महिन्यात म्हटलं होतं की, कोणत्याही सेवानिवृत्त अधिकाऱ्याचा कार्यकाळ अपवादात्मक परिस्थितीतच वाढवला जाऊ शकतो. तसेच न्यायालयाने १२ डिसेंबर २०२२ रोजी संजय कुमार मिश्रा यांना दिलेल्या तिसऱ्या मुदतवाढीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर केंद्र सरकार आणि इतरांकडून उत्तरही मागवले होते. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये केंद्र सरकारने संजय कुमार मिश्रा यांना निवृत्त होण्याच्या एक दिवस आणखी एक वर्षाची मुदतवाढ दिली होती. मिश्रा यांच्या कार्यकाळातील ही तिसरी मुदतवाढ होती. या मुदतवाढीमुळे ते १८ नोव्हेंबर २०२३ पर्यंत पदावर कायम राहणार होते. मात्र, याबाबत दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी पूर्ण केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला धक्का दिला. न्यायालयाने मंगळवारी ईडीचे संचालक संजय कुमार मिश्रा यांना तिसऱ्यांदा दिलेली मुदतवाढ अवैध ठरवली. पण मिश्रा यांना ३१ जुलैपर्यंत पदावर राहण्याची परवानगी दिली आहे.

### चर्चेतली बातमी

## सप्टेंबरमध्ये काँग्रेस काढणार पदयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची मंगळवारी दिल्लीत बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, के.सी.वेणुगोपाल, एच. के. पाटील आणि नाना पटोले उपस्थित होते. आगामी लोकसभा निवडणुकांसदर्भात या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती नाना पटोले यांनी बैठकीनंतर दिली. काँग्रेस एकसंघ आहे. महाराष्ट्रात काँग्रेस फुटणार नाही. येणाऱ्या निवडणुकीत महाराष्ट्रात सर्वांत मोठा पक्ष काँग्रेस असेल. काँग्रेसची सध्या लाट आहे. आज लोकांनी ते मान्य केले आहे, त्याचा रिझल्ट तुम्हाला दिसेलच. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आमचं ४८ जागांवर काम सुरू आहे. जर आघाडी झाली तर आमच्या पक्षाची ताकद त्यांना मिळेल. महाराष्ट्र असे राज्य आहे जिथे शाहू फुले आंबेडकरांची विचारधारा आहे. जे आमच्यासोबत येतील, त्यांना आमचा फायदाच होणार आहे, असे नाना पटोले म्हणाले. महाराष्ट्रात जिल्हा आणि ब्लॉक पातळीवर पक्ष संघटन केले जाईल. पदयात्रा काढली जाईल. या पदयात्रेतून नरेंद्र मोदी सरकारच्या आणि महाराष्ट्रातील तिघाडा सरकारमध्ये कसा ईडी आणि खोक्याचा वापर झालाय, भीती घालून महाराष्ट्राची विचारधारा विकत घेण्याचे काम मोदींनी केले आहे हे जनतेत जाऊन सांगणार आहोत.

# 'तर ईंट का जवाब पत्थर से' बावनकुळेंचा ठाकरेंना इशारा

## देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल बोललात तर आम्ही तुम्हाला सोडणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर खालच्या स्तरावर जाऊन टीका केल्यानंतर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांना 'ईट का जबाव पत्थर से' देणार असल्याचा इशारा दिला आहे.
मंगळवारी त्यांनी नागपुरात पत्रकार परिषदेतून उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले, "उद्धव ठाकरे तुमचे संतुलन बिघडले असेल, तर मनोरुग्णालयात जा. नागपुरात मनोरुग्णालय आहे. तिथे जाऊन उपचार घ्या. तुम्ही बावचळले असाल तर डॉक्टर बदला. परंतु, यापुढे जर आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल बोललात तर आम्ही तुम्हाला सोडणार नाही. आत्ता रस्त्यावर आंदोलन केलेय, पुढचे आंदोलनात आमचे लोक तुमच्या गाड्या अडवल्याशिवाय राहणार नाहीत. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याला तुम्ही जबाबदार







असाल, अशा शब्दात त्यांना स्पष्ट इशारा दिला. देवेंद्र फडणवीस हे कर्तृत्वाचे धनी आहेत. तर, उद्धव ठाकरे हा कलंकित करंटा आहे, असे सांगून बावनकुळे म्हणाले, यापुढे तुम्ही पुन्हा असे काही बोललात तर नागपूरची जनता तुम्हाला जोड्याने बदडेल. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी डेटा तयार केला. हायकोर्ट, सुप्रीम कोर्टापर्यंत आरक्षण टिकविले व परत मिळवून दिले. देशातील सर्वात मोठे मेट्रोचे नेटवर्क देवेंद्र फडणवीस यांनी उभारले. महाराष्ट्रातील जनतेला दुष्काळमुक्त करण्यासाठी जलयुक्त शिवारसारखी योजना सुरु केली. राज्यात लोड शेडिंग कमी करण्यासाठी योजना राबविली. एक रुपयांत पीक विमा योजना आणली. महत्वाकांक्षी समृद्धी महामार्ग तयार केला. ही देवेंद्र फडणवीस यांची दूरदृष्टी आहे. उद्धव ठाकरेंची सुरुवात माझे वडील, त्यापुढे माझा कॅमेरा, माझी पत्नी. वयाच्या ६० व्या वर्षी मी, माझा मुलगा, मंत्री, माझी पत्नी आणि मुख्यमंत्री असा असून तेच 'कलंक' आहेत, असे सांगून बावनकुळे म्हणाले की, ठाकरेंनी मराठा समाजाचे, ओबीसींचे आरक्षण घालविले. स्वतःच्या अहंकारासाठी जलयुक्त शिवार योजना बंद पाडली. कमिशन मिळत नसल्याने मेट्रो प्रकल्पाची कामे बंद पाडली. कोरोनाच्या काळात महाराष्ट्राला अंधारात लोटले.. बरेच कलंकित कामे केली. संभाजीनगर, धाराशीव, अहिल्यादेवीनगर अशी नावे देऊन अभिमानाने महाराष्ट्राचे नाव उंचविणारे देवेंद्र फडणवीस-एकनाथ शिंदे आणि त्याचवेळी संभाजीनगरला संभाजीनगर म्हणणार नाही अशांची साथ देणारे कलंकित व्यक्ती म्हणजे उद्धव ठाकरे. स्वातंत्र्यवीर सावरकारांचा अपमान कॉंग्रेस करीत असताना त्यांचा विचार, संस्कार, संस्कृती जपली पाहिजे व पुढच्या पिढीने त्यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत यासाठी रात्रंदिवस काम करणारे व्यक्ती देवेंद्र फडणवीस असून, स्वातंत्र्यवीरांचा अपमान करणाऱ्यांची साथ देणारे उद्धव ठाकरे कलंकित करंटे आहेत. नक्षलवादी, जिहादी आणि औरंग्यांच्या प्रेमी पडलेल्या लोकांना तरुंगात टाकणारा व्यक्ती देवेंद्र फडणवीस आहे. जिहाद्यांना नक्षलवाद्यांच्या मुव्हमेंटला संरक्षण देणारा त्याच्यावर कुठलीही कारवाई न करणारा कलंकित व्यक्ती उद्धव ठाकरे आहेत.

> देवेंद्र फडणवीस यांनी जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या बळावर नगरसेवक ते मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राच्या राजकारणात उच्चपदापर्यंत यशस्वी प्रवास केला . तर उद्धव ठाकरे यांनी स्वत :च्या नेतृत्वाला कर्तृत्व समजून जनतेशी बेईमानी करुन मुख्यमंत्रीपदापर्यंतचा अयशस्वी प्रवास केला .
> – **चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष, भाजपा, महाराष्ट्र**

# उगवतीचे रंग





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


अशा मुलांशी कोणी मैत्री करण्याचा विचार करतो का ? ज्यांची बंगलेवजा मोठी घरे आहेत, अनेक खोल्या रिकाम्या आहेत, घराबाहेर दोन दोन चारचाकी आहेत, हवे ते सगळे मिळते आहे अशी माणसे ठरवले तर सहज अशा मुलांना मदत करू शकतात. त्यांच्या मुलांना अशा मुलांशी मैत्री करायला सांगू शकतात ? पण छे छे ! मी भलतेच काहीतरी बोलतो आहे, असे तुम्हाला नक्कीच वाटेल. आणि तुमचे बरोबरच आहे. तुम्ही म्हणाल, ' अहो, या झोपडपट्टीतील किंवा गरीब घरातील मुलांनी असे उज्ज्वल यश मिळवले असले तरी सगळीच मुले चांगली नसतात. त्यांच्यावर संस्कार नसतात. ती घाणेरडं बोलतात, शिव्या देतात. त्यांच्या संगतीत आमची मुले बिघडणार नाहीत का ?' होय मंडळी, तुमचे म्हणणे थोडेसे खरे आहे, पण पूर्णांशाने नाही. आजकाल आपले मैत्रीचे निकषच बदलले आहेत. मैत्री कोणाशी करायची तर, ज्याचा आपल्याला उपयोग होईल, त्याच्याशी. आपल्यापेक्षा ज्याची परिस्थिती अधिक चांगली असेल त्याच्याशी. कारण तो आपल्या उपयोगी पडू शकतो. आपल्या मुलांचे मित्र कोण असावेत हे त्यांच्यापेक्षा आपणच ठरवतो. एखाद्या मुलाचे वडील डॉक्टर, वकील, अधिकारी, प्राध्यापक वगैरे असे काही असतील, तर तो मुलगा आपल्या मुलाशी मैत्री करायला लायक. एखाद्याचे वडील कारकून, शिपाई, हमाल वगैरे असतील तर... ? ' बिलो डिग्निटी ' आपल्या प्रतिष्ठेच्या आड नाही का येत ती गोष्ट ! त्याचप्रमाणे एखाद्याची आई भांडी धुणी करणारी असेल, स्वयंपाक करणारी असेल, मोलमजुरी करणारी असेल तर तिचा मुलगा किंवा मुलगी काय मैत्रीसाठी अयोग्य ठरते ? एखादी आई डॉक्टर असेल, इंजिनिअर असेल, बँकेत असेल वा अन्य कोणी उच्चपदस्थ अधिकारी वगैरे असेल, तर तिचा मुलगा किंवा मुलगी मैत्रीला पात्र ! आपल्या मुलांसाठी हे मैत्रीचे निकष पालक म्हणून आपण ठरवले. आपला मुलगा जर आपल्यापेक्षा खालच्या परिस्थितीतील घरातला असेल, तर आपण मुलाला सांगणार, ' त्याच्यात जात जाऊ नकोस रे खेळायला. त्याच्याशी मैत्री करू नकोस. आणि आणखी बरेच काही. ' नकळत आपणच आपल्या मुलावर भेदभावाचे संस्कार लहानपणापासून करत असतो. गरिबांच्या घरात, झोपडपट्टीत राहणाऱ्यांच्या घरात मुलांवर चांगले संस्कार होत नाहीत हे जरी काही अंशी मान्य केले तरी श्रीमंतांच्या घरात ते चांगल्या प्रकारे होतातच असे कोणी छातीठोकपणे सांगू शकत नाही.



प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यातच माझे सौख्य सामावले आहे.

## मी प्रतिज्ञा करतो की...



# आनंदी पहाट

## सुखाचा संबंध शरीरापुरताच मर्यादित

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

समाधानाचा संबंध हा केवळ अंतर्मनाशीच निगडीत असतो. आपण नेहमीच म्हणतो समाधान आपल्या मानण्यात असले पाहिजे. पण म्हणजे नक्की काय करायला पाहिजे ? जेणेकरून समाधान प्राप्त होईल. संपूर्ण जग सुंदर आहे, फक्त तसे पाहायला हवे; प्रत्येक नाते जवळचे आहे, फक्त ते उमजायला हवे; प्रत्येक गोष्टीला अर्थ आहे, फक्त तसे समजायला हवे, प्रत्येक वेळेत समाधान आणि आनंद आहे फक्त तसे जगायला हवे. आपण आपल्या उणिवा दूर करत गेलोत आणि प्रत्येक बाबतीतील जाणीव करून घेत गेलोत कि समाधान मिळायला सुरुवात होतेच. पण आपण आपल्यांत काही उणिवा आहेत ह्याची जाणिवाच करून घेत नाहीत, त्यामुळे असमाधानी राहतो. जगी सर्व सुखी असा कोण आहे ? का बरे असे म्हणावे लागते ? जगात सुखी असणाऱ्यांची संख्या खरेच नगण्य आहे का ? अर्थात हे सर्व काही आपल्या बघण्याचा दृष्टीकोन ठरवत असतो. जसा चष्मा लावावा तसे दिसते. आपला दृष्टीकोन जेव्हढा महत्वाचा असतो, तेव्हढाच आपल्याला दृष्टी कोण देतो, तो देखील तितकाच महत्वाचा असतो. आपला प्रत्येक विचार आपल्याला काही विशिष्ठ अनुभूती देत असतो. अनेकदा आपण विचारांची सुरुवातच नकारात्मकतेने करत असतो. आपल्याला अमुक एखाडे काम जमणारच नाही, तमुक एक गोष्ट तशी असूच शकत नाही इत्यादी प्रकारच्या नकारत्मक विचारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर, वर्तनावर, कालांतराने व्यवहारावर होऊ लागतो. अर्थातच होणारा परिणाम देखील नकारात्मक असल्याचे आपल्याला अनुभवायला येते. सुख म्हणजे नक्की काय असते..... ? ते केवळ ज्याचे-त्याने अनुभवल्यावरच समजू शकते. तसे बघितले तर सुखाचा संबंध शरीराशी निगडीत असतो.



आधुनिक केसरी

**रमते भजनी | विठ्ठलाच्या ||**
नसे आम्हा चाड | संसारी सुखाची ||
तुझ्या रे नामाची | गोडी लागो ||१||
घडो निरंतर | कर्म अधिष्ठान ||
वृत्ती अनुष्ठान | सत्वगुणी ||२||
रज तम गुण | शिवू नये मना ||
बुध्दीची भावना | शुद्ध व्हावी ||३||
कृतीने घडावा | हरिपाठ पिंड ||
दांभिकांची झुंड | दावू नको ||४||
बालवृत्ती माझी | रांगते अंगणी ||
रमते भजनी | विठ्ठलाच्या ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

बालकोऽहं च ते देवि क्षमस्व परमेश्वरी |
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ४० ||
हे देवी, मी तुझा बालक आहे. मला क्षमा कर. तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.

# घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

क्षणिक प्रेम सबमें जगे, क्षण भर में मिट जाय । मर्य्यादा अनुराग की, विघ्न कठिन रह जाय ।।०९।।(स्ववेंद पंचम मण्डल चतुर्थ अध्याय) ०५/०४/०९
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
क्षणभर राहाणारे प्रेम सर्वांमध्ये असते जे क्षणात नाहीसे होते. खऱ्या प्रेमाचे महत्त्व हेच आहे की जे कठीण विघ्न आल्यावरही एक स्वरूपात स्थिर राहाते.



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# दुश्चीतनिरूपण

आधुनिक केसरी

"दासबोध"हा धर्मग्रंथ गुरू शिष्य संवाद आहे. खरं सांगू मित्रांनो असा गुरू व असे शिष्य मिळणे भाग्यात लागते. आपण त्या भाग्यवंता पैकी आहोत. कारण हा ग्रंथ आपण मनापासून वाचत आहोत समर्थाचे विचार आचरणात आणण्याचा प्रयत्न करत आहोत. श्रोता विचारतो की सतत सत्संगाची कास धरावी,असे तुम्ही सांगता पण सत्संग एकदा का लाभला तर मोक्ष किती दिवसात मिळतो. ब्रम्हदर्शन घडून मुक्ति किती दिवसांत लाभते. यावर गुरू असे सांगतात की सत्पुरूष जो उपदेश करतात त्यावर संपूर्ण विश्वास ठेवला तर लगेचचं आत्मज्ञान होऊन मोक्ष मिळतो. पण संतांच्या विचाराकडे तुम्ही दुश्चितपणाने पाहिले तर आपण संतांच्या पर्यन्त पोहचू शकत नाहीत. व त्यामुळे मंगलाची आशा किंवा मंगलवेळ लवकर येत नाही. म्हणून सतत संतवाक्यावर भरोसा ठेवावा. मन सुचित असते पण अचानक पणे ते कुठेतरी भरकटते व दुश्चित होते तर अशा मनाला शांत कसे करावे ? आपण आपल्याला नेमून दिलेले विहितकर्म तर करत असतो ते करत असताना निरनिराळ्या वस्तूंकडे व विषयांकडे मन ओढले जाते ते प्रथम थांबवावे जे कर्म करत आहोत ते मन लावून करावे म्हणजेच एकाग्रचित्त व्हावे. ऊगाच वेळ वाया घालवू नये. वेळ सार्थकी लावावा. --दुसऱ्या बाजूने विचार करता आपण जो ग्रंथ श्रवण करतो त्यामधील अर्थ,प्रमेय,सिध्दांत हे शोधून काढावे व आपल्यातील बौध्दीक संपदा वाढवावी. मनाची तन्मयता,एकाग्रचित्त ठेवून श्रवण पठन करावे. पण काही वेळा ही एकाग्रता कमी होते मन भलतीकडेच लागते तेव्हा परत परत श्रवण करावे.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भगवंताचे अनुसंधान कसे ठेवावे ?

आधुनिक केसरी

ज्या गोष्टीचे अत्यंत प्रेम आहे तिचे अनुसंधान मनुष्याला आपोआप राहते. ते इतके टिकते की ते अनुसंधान मला आहे ही जाणीवही राहत नाही. ' अनुसंधान ठेवतो ' असे म्हणताना ' मी ' त्याच्याहून वेगळा असतो; आणि प्रेमाचे जे अनुसंधान असते तिथे मी एकजीवच होतो. आपण कितीही गडबडीत असलो तरी वाटेने जात असताना आपल्या नावाने कुणी हाक मारली की आपण वळून पाहतो. हे आपले अनुसंधान आहे; कारण या देहावर आपले इतके काही प्रेम आहे, की मी त्याच्याहून वेगळा नाहीच ! असे देहाचे अनुसंधान कसे ठेवावे हे सांगावे लागत नाही. ' देहाचा विसर पाडा ' म्हणून सांगावे लागते, 'देहाचे स्मरण ठेवा ' म्हणून नाही सांगावे लागत ! आम्हांला भगवंताचे अनुसंधान ठेवायचे आहे. हा एक प्रकारचा अभ्यास आहे. भगवंताचे प्रेम वाढले तर अनुसंधान टिकेल. परीक्षा पास होण्याकरिता जसा अभ्यास करावा लागतो तसा भगवंताचे प्रेम वाढविण्याकरिता अभ्यास करणे जरूर आहे. यासाठी, जे जे काही मी करीन



ते ते मी भगवंताच्या साक्षित्वाने करतो आहे ही जाणीव ठेवून करायला पाहिजे. आज आम्हांला नाना तऱ्हेचे उद्योग करावे लागतात. प्रपंच म्हटला म्हणजे किती गोष्टी कराव्या लागतात ! त्या सगळ्या गोष्टी करीत असताना भगवंताचे स्मरण ठेवून करणे, हे आपले खरे कर्तव्य आहे.
सर्कशीमध्ये आपण पाहतो ना ! वाघ, सिंह, घोडे, हत्ती काय जे प्राणी असतील ते खेळ खेळतात. घोडा कसा सुंदर नाचतो असे आपण म्हणतो ! पण त्या घोड्याचे लक्ष प्रेक्षकांकडे नसते. त्या घोड्याचे, त्या वाघाचे, त्या सिंहाचे लक्ष आतमध्ये चाबूक उगारणारा जो मनुष्य असतो त्याच्याकडे असते ना ? प्रेक्षक काय म्हणतील ते तो प्राणी पाहत नाही. आणि आपण काय करतो ? भगवंत काय म्हणेल हे पाहतच नाही, जग काय म्हणेल हे पाहतो ! हे जर आम्ही सोडले ना, तर भगवंताला काय हवे आहे हे आम्हाला बरोबर कळेल. भगवंताचे स्मरण ठेवून कर्म केल्याने त्याला काय हवे तेच आमच्या हातून घडेल. त्याचे संधान न सोडता कर्म करणे हे अनुसंधानाचे लक्षण आहे. हे कशाने होईल ? अत्यंत प्रेमाने होईलच. एक बाई नुकतीच बाळंत होऊन सासरी आल्यावर तिने मूल पाळण्यात निजविले, आणि मागच्या परसामध्ये ती भांडी घाशीत होती. ते मूल थोडेसे कुठे रडले. घरात पुष्कळ माणसे होती, कुणाला ऐकू नाही गेले. ती पोरगी मात्र धावत पाळण्यापाशी आली, आणि ' मूल उठलेले दिसते आहे ' असे म्हणाली. काम करताना तिचे कान जसे पाळण्याकडे होते, तसे प्रपंच करताना आपले लक्ष मात्र भगवंताकडे असले पाहिजे. याचे नाव अनुसंधान !
**आजचे बोधवचन आहे - अखंड मुखी रामनाम, आत असावे अनुसंधान, देहाने करावे प्रपंचाचे काम. श्रीराम समर्थ**

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

(१४) मधुमाशी - कोणत्याही वस्तूचा अति संग्रह करू नये हे मधुमाशी पासून शिकलो .मधुमाशी संग्रह करते लोक तिला मारून मध काढून घेतात.तेव्हा संग्रह करण्या पेक्षा दान करा . (१५) हरीणः- हत्ती स्पर्श सुखाच्या लालसेने मारतो तर हरीण संगीत श्रावणाच्या लालसेने मारतो म्हणून योग्याने गीत नृत्य,संगीत इ.विषयांचा त्याग करावा. (१६) मासळीः- रससुख व जिव्हा स्वाद यांची लालूच मासळीला मारते . गळा च्या काट्याला लावलेला मांसाचा तुकडा खायला मासोळी जाते व गळाला अडकून मरते. माणसाला हि जिव्हा फार त्रस्त करते .सर्व इंद्रिये जिंकून जिभेवर ताबा नसला तर नाश झाल्याशिवाय रहात नाही .जो रसनेला जिंकतो तो सर्वच जिंकू शकतो. (१७) वेश्या :- एक वेश्या सदा काम , विषयवासना ह्यात गुरफटलेली असायची . खूप पैसे मिळवले होते तिने. खूप सुंदर हि होती. परंतु एका दिवशी काय झाले माहित नाही. नटून थाटून गिर्हैकाची वाट बघत बसली.

क्रमशः

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**क्षणशः कणशचैव विद्यामर्थं च साधयेत् ।क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ॥**
**स्पष्टीकरण - आठ महिने केवळ खेळण्यात वाया घालवायचे आणि शेवटचे महिना-दोन महिने अभ्यास करून कसेबसे परीक्षेत उत्तीर्ण व्हायचे, याला विद्या मिळविणे म्हणत नाहीत. ज्ञानासाठी क्षणाक्षणाचा प्रयोग करावा लागतो. धनाचेही तसेच आहे. लहान लहान फायद्याविषयी जागरूक राहूनच मोठा धनलाभ साधता येतो.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १२ जुलै २०२३




सुशिक्षित कोणाला म्हणायचे ?

पान ६



आईचा हात जीवनावर मार्मिक भाष्य करणारी कविता : प्रा. रामदास केदार

पान ७

# मोदी देशासाठी तर फडणवीस महाराष्ट्रासाठी हानिकारक

## अतुल लोंढे : फॉक्सकॉनने वेदांताची साथ सोडल्याने देशाचे १० लाख कोटींचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वेदांदा-फॉक्सकॉन हा सेमीकंडक्टर प्रकल्प पुण्याजवळ प्रस्तावित होता पण गुजरात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय फायद्यासाठी तो गुजरातला पळवण्यात आला पण आता हा प्रकल्प गुजरातमध्ये साकार होणार नाही. वेदांताबरोबरच्या भागिदारीतून फॉक्सकॉनने माघार घेतल्याने हा प्रकल्प बारगळला आहे. हा प्रकल्प पुण्यात होणार होता, त्याची सर्व प्रक्रिया पार पडली होती, मविआ सरकारनेही सर्व सवलती व सुविधा देण्याची तयारी दर्शवली होती पण महाराष्ट्राचा प्रकल्प गुजरातला पळवून नेला पण आता तो तिथेही होत नाही. त्यामुळे महाराष्ट्राचे आणि पर्यायाने देशाचे मोठे नुकसान झाले आहे. म्हणूनच मोदी हे देशासाठी तर फडणवीस हे राज्यासाठी हानीकारक आहेत, अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.

नागपूर प्रेस क्लब येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना अतुल लोंढे पुढे म्हणाले की, वेदांता फॉक्सकॉन हा महत्वाचा प्रकल्प गुजरात विधानसभा निवडणुका तोंडावर असताना महाराष्ट्रातून पळवून नेला. तब्बल १.५ लाख कोटी रुपये गुंतवणुक व १ लाख नोकऱ्या निर्माण करणारा हा प्रकल्प होता. वेदांता फॉक्सकॉन प्रकल्पासाठी पुणे परिसरातील वातावरण अत्यंत अनुकुल असे आहे, पुणे हे औद्योगीक क्लस्टर असून विमानतळ, बंदरे आणि रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने सोयीचे ठिकाण आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ, आवश्यक सोयी सुविधा या परिसरात उपलब्ध आहेत. वेदांता फॉक्सकॉन प्रकल्पासाठी द्यावयाच्या सुविधा व सवलतीसंदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठकही झाली होती पण हा प्रकल्प गुजरातमध्ये नेण्यात आला. गुजरातमध्ये ज्या भागात य प्रकल्पाला जागा देण्यात आली त्या ठिकाणी हा प्रकल्प उभा राहणे अशक्यच होते, शेवटी तेच झाले. हा प्रकल्प गेल्यामुळे देशाचे तब्बल १० लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातून हा प्रकल्प देवेंद्र फडणवीसांच्या हाताखालून गेला. राज्यातील लाखो तरुणांचे रोजगारही गेले. प्रकल्प गुजरातला नेला पण गुजरात सरकार व केंद्र सरकारने या प्रकल्पाना सोयी सुविधा दिल्या नाहीत असे रॉयटर या वृत्तसंस्थेने म्हटले आहे.

फॉक्सकॉनने वेदांताबरोबरचा करार मोडीत काढल्याने आता मायक्रॉन सेमीकंडक्टर प्रकल्पाच्या भवितव्यावरही संशयाचे ढग जमा झालेत. वायब्रंट गुजरात व मेक इन इंडियाच्या नावाने मोठ्य-मोठ्या घोषणा केल्या गेल्या पण प्रत्यक्षात त्यातील किती प्रकल्प आले यावर श्वेतपत्रिका काढण्याची गरज आहे. फॉक्सकॉनने माघार घेतल्याने इतर कंपन्यांच्या परदेशी गुंतवणुकीवरही याचा परिणाम होऊन भारताचे नुकसानच होणार आहे. महाराष्ट्रातून याआधी वेदांता फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क केमीकल्स यासह अनेक उद्योग व संस्था महाराष्ट्राबाहेर गेल्या त्याला भाजपा, फडणवीस हेच जबाबदार आहेत. रशिया-युक्रेनचे युद्ध पंतप्रधान नरेंद्र मोदी थांबवू शकतात पण देशातून जाणारे उद्योग मात्र थांबवू शकत नाहीत, हे दुर्दैवी आहे. सरकार कोणाचेही असो उद्योग निघून जाणे विकासाच्या दृष्टीने चांगले नाही, असेही लोंढे म्हणाले.

# जिल्हा शल्य चिकित्सक व रुग्णालय कर्मचारी यांच्या कार्यातून आरोग्य निर्देशांकात जिल्हा सामान्य रुग्णालय राज्यात दुसरे

## जिल्हा शल्य चिकित्सक राज पाटील यांचे जिल्हाभरातून कौतुक





आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** राज्य शासनाच्या राज्यस्तरावरील आरोग्य निर्देशांकमध्ये विविध विषयास अनुसरून उल्लेखनीय कार्य करत जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालयाचा आरोग्य निर्देशांकमध्ये दुसरा नंबर मिळवल्याबद्दल जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राज पाटील ( गलांडे ) रुग्ण कल्याण समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यापूर्वीही जिल्हा शल्य चिकित्सक पदावर डॉ.राज पाटील( गलांडे ) असताना जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद कडून आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल गौरविण्यात आले त्याबद्दलही डॉ राज पाटील( गलांडे )यांचे कौतुक झाले आहे, अशा उल्लेखनीय कार्याबद्दल राज्याचे राज्यपाल यांनी त्यांचा गौरव देखील केला आहे. या कार्यक्रमास रुग्ण कल्याण समिती सदस्य लतीफ अब्दुल मजीद, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नैतिकता समिती सदस्य गणेश रानबा वाघमारे, दिपक पांढरे, प्रविण जगताप, वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडेवार, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी लाकाळ, डॉ. इस्माईल मुल्ला, डॉ. कोटलवार, डॉ.घाडगे, डॉ.महेश पाटील, डॉ. महाजन, डॉ. स्नेहल मॅडम, डॉ. पवार मॅडम सह परिचारिका, पत्रकार मुसाभाई सय्यद, श्रीकांत मटकिवाले, चव्हाण अन्य इतर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमित्रा गोरे यांनी केले तर आभार डॉ. महेश पाटील यांनी मानले.

# उद्धव ठाकरेंना मानसोपचार तज्ज्ञाची गरज : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी नागपूरमध्ये केलेल्या भाषणात देवेंद्र फडणवीस हे नागपूरचा कलंक आहेत असे वक्तव्य केले. त्यानंतर उद्धव ठाकरेंच्या विरोधात भाजपाने आरोपांच्या फैरी सुरु केल्या आहेत. स्वतः देवेंद्र फडणवीस यांनीही आठ मुद्दे मांडत उद्धव ठाकरेंना तुम्हीच कसे कलंकित आहात ते ट्विटरवर सांगितले. त्यानंतर आज उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषद घेऊन पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस तसेच भाजपा कलंकित आहे. मी माझ्या म्हणण्यावर ठाम आहे असे वक्तव्य केले. याविषयी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता उद्धव ठाकरेंना आता मानसोपचार तज्ज्ञाची गरज आहे असा टोला फडणवीस यांनी लगावला आहे.

आमचे राजकीय विरोधक उद्धव ठाकरे यांच्या विचारांची आणि वागणुकीची मला कीव येते. मला असं वाटतं की उद्धव ठाकरेंना मानसोपचार तज्ज्ञाची गरज आहे. जी काही परिस्थिती आत्ता त्यांच्यावर आहे त्यामुळे त्यांच्या विचारांवर विपरीत परिणाम झाला आहे. अशा मानसिकतेतून एखादा व्यक्ती जेव्हा काही आरोप करतो किंवा काहीतरी बोलून बसतो, तेव्हा त्यावर आपण काहीही न बोलणे चांगले त्यामुळे मी यावर आता काही बोलणार नाही. असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी या सगळ्या प्रकरणावर उत्तर दिले आहे.

देवेंद्र फडणवीस यांना नागपूरचा कलंक असे म्हटले गेल्याने भाजपा आक्रमक झाली आहे. नागपूरमध्ये उद्धव ठाकरेंचे बॅनरही भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी फाडले. तसेच चंद्रशेखर बावनकुळे, किरीट सोमय्या, नितेश राणे यांनीही या विषयी उद्धव ठाकरेंवर घणाघाती टीका केली. तर संजय राऊत यांनी हे संपूर्ण सरकारच कलंकित असल्याचे म्हटले आहे. कलंक या शब्दावरुन सोमवारपासूनच महाभारत रंगले आहे. अशात देवेंद्र फडणवीस यांनी आता उद्धव ठाकरेंना मानसोपचार तज्ज्ञाची गरज असल्याचे म्हटले आहे.

# मूळ शिवसेना कोणती? याचिकेवर न्यायालयात ३१ जुलै रोजी सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** शिंदे गट हीच मूळ शिवसेना असल्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालाला ठाकरे गटाने दिलेल्या आव्हान याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात ३१ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड व न्या. पी. एस. नरसिंहा यांच्या खंडपीठासमोर युक्तिवाद केला जाईल.

केंद्रीय निवडणूक आयोगाने १७ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निकालामध्ये शिवसेना हे पक्षनाव व धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह शिंदे गटाला बहाल केले आणि हा गट मूळ शिवसेना असल्याचा निर्वाळा दिला. राज्यातील सत्तासंघर्षांचा खटला घटनापीठासमोर सुरू असल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालाला स्थगिती देण्याची विनंती उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयाला केली होती. मात्र, सरन्यायाधीश चंद्रचूड, न्या. पी. एस. नरसिंहा व न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या खंडीपाठाने स्थगिती देण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने ठाकरे गटाला उद्धव बाळासाहेब ठाकरे हे पक्षनाव व धगधगती मशाल हे निवडणूक चिन्ह वापरण्याची परवानगी दिली होती. मात्र केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालाला ठाकरे गटाने आव्हान दिले असून त्यावर जुलैअखेरीस सुनावणी होईल. राज्यपालनियुक्त १२ आमदारांच्या प्रकरणाची सुनावणी मंगळवारी ११ जुलै रोजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्यासमोर होणार आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये या नियुक्त्यांना न्या. के. एम. जोसेफ यांनी स्थगिती दिली होती. महाविकास आघाडी सरकारने पाठवलेल्या आमदारांच्या यादीवर तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारींनी निर्णय घेतला नव्हता. मात्र, शिंदे गट-भाजप सरकारच्या नव्या यादीला मान्यता दिली होती. नव्या यादीला सर्वोच्च न्यायालयातील याचिकेद्वारे विरोध करण्यात आला आहे.




# फॉक्सकॉनचे घूमजाव

आधुनिक केसरी

सेमीकंडक्टर हब होण्याच्या भारताच्या स्वप्नांना मोठा झटका बसला. चीनला शह देण्यासाठी पंतप्रधानांनी हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला होता. फॉक्सकॉन-वेदांता प्रकल्पाची पायाभरणी गुजरात राज्यात झाली होती. महाराष्ट्रातून हा प्रकल्प गुजरातमध्ये नेल्याचा विरोधकांचा आरोप होता. त्यावेळी मोठे राजकारण तापले होते. या प्रकल्पासाठी पुण्यातील तळेगाव दाभाडे येथील जमिनीची पाहणी झाल्याचा दावा महाविकास आघाडी सरकारने केला होता. सुरुवातीपासूनच वादात असलेल्या या प्रकल्पाचा शेवट सुद्धा कुठल्या तरी वादातूनच झाल्याची चर्चा आहे. तैवान कंपनी फॉक्सकॉनने तडकाफडकी या प्रकल्पातून माघार घेतली नाही, हे तर स्पष्ट आहे. तैवानची कंपनी फॉक्सकॉन टेक्नॉलॉजीने भारत सरकारसह वेदांता समूहाला झटका दिला. गुजरातमध्ये साकार होणाऱ्या सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्पातून माघार घेतली. या कंपनीने 19.5 अब्ज डॉलरचा करार मोडीत काढला. या निर्णयाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या, भारताला सेमीकंडक्टर उत्पादनात नंबर वन देश होण्याच्या स्वप्नांना धक्का बसला. भारत सरकारने या घडामोडींवर स्पष्ट भूमिका मांडली. दोन्ही कंपन्या भारतात स्वतंत्रपणे वाटचाल करत आहेत. हा करार रद्द झाल्याने सेमीकंडक्टर हब होण्याचे प्रयत्न सोडणार नसल्याचे भारताने स्पष्ट केले. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखरन यांनी या दोन्ही कंपन्या स्वतंत्रपणे या क्षेत्रात रणनीती तयार करत असल्याचा दावा केला. भारताने गेल्या 18 महिन्यात सेमीकॉन क्षेत्रात मोठी झेप घेतल्याचा दावा त्यांनी केला. फॉक्सकॉनने करार मोडण्यासंबंधी बाजू मांडली. एका सेमीकंडक्ट कल्पनेवर दोन्ही कंपन्यांनी सोबत काम करण्याचा निर्णय घेतला होता. पण नंतर सोबत काम न करण्याविषयी दोन्ही कंपन्यांनी एकमेकांच्या सहकार्याने निर्णय घेण्यात आला. फॉक्सकॉन वेदांताच्या मालकीच्या प्रकल्पातून बाहेर पडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फॉक्सकॉनच्या माहितीत वेदांता कंपनीने भर घातली. सेमीकंडक्टर प्रकल्पाचे काम थांबणार नाही. कंपनी या प्रकल्पासाठी वचनबद्ध आहे. कंपनी आता नवीन कंपनीच्या, भागीदाराच्या शोधात असल्याचे आणि त्यासंबंधी चर्चा सुरु असल्याचे वेदांताने स्पष्ट केले. तैवान कंपनी फॉक्सकॉन इलेक्ट्रिक उत्पादने आणि सेमीकंडक्टरसाठी प्रसिद्ध आहे. एप्पल कंपनीचा फोन हीच कंपनी तयार करते. ही कंपनी भारतात सेमीकंडक्टर प्रकल्प विस्तार करण्याच्या तयारीत आहे. त्यासाठी कंपनीने वेदांतासोबत करार केला होता. गेल्यावर्षी सप्टेंबर महिन्यांत पंतप्रधानांनी गुजरातमध्ये हा प्रकल्प उभारण्याची घोषणा केली होती. वृत्तसंस्था रॉयटर्स नुसार, भारत सरकारकडून PLI योजनेचा लाभ देण्यात मोठा विलंब होत आहे. अनेक परवानग्या मिळण्यात पुन्हा वेळ खर्ची जाणार असल्याने फॉक्सकॉन स्वतंत्रपणे सेमीकंडक्टर प्रकल्प उभारण्याच्या तयारीला लागले आहे. भारत सरकारने 2026 पर्यंत सेमीकंडक्टर उत्पादन 63 अब्ज डॉलरपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या प्रकल्पासाठी फॉक्सकॉनसह तीन कंपन्या इच्छूक असल्याचे समजते.

# सत्ताबदल व्हावं ; मनबदल वा विचारबदल नकोच ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**सत्तेसाठी पक्षबदल. तसं सत्ताबदल व्हायला नको. सत्ताबदल ही आपल्याला लागलेली पुरातन काळातील कीड आहे. पुर्वी लोकं वतनासाठी असे दल बदलायचे. त्यातच कोणी देशातील स्वराज्यात राहात तर कोणी मुघलांना मिळत. तीच स्थिती आजही अस्तित्वात असलेली दिसते. आजही या देशात तोच प्रकार. सत्तेसाठी राजकारण आणि फितुरी. फितुरीनंच आपले पुर्वज मारले गेले तरीही. आपलं कितीतरी नुकसान झालं तरीही......तरीही आपण सुधारलो नाही आणि आता तर वाटतं की आपण कधीच सुधारणारही नाही. कारण आपले मन बदल व विचार बदल झालेले आहे. आज देशातील काही शहाणे व काही लोकांची परिस्थिती अशी आहे की मुर्खांच्या बाजारात मुर्खांचीच चांदी. गुणवत्ता मात्र लुप्त होतांना दिसत आहे.**

हे मुर्ख सत्ताही गाजवतात. ते सत्तेवर बसतात. कारण ते चमचेगिरी करीत असतात. चमचेगिरी कशासाठी ? तर त्यांना काहीच येत नाही यासाठी. शिवाय मंत्रीपद मिळावं म्हणून. मग मंत्रीपद मिळताच त्यांचं खाजगी राजकारण यशस्वीही होतं. कारण काम त्यांना करावं लागत नाही. काम करीत असतो अधिकारी वर्ग. तो अधिकारी वर्ग तेवढा हुशार असावा.

चमचेगिरी करणारा व्यक्ती राजकारणच नाही तर सर्वच आघाड्यांवर पुढं जात असतो. कारण प्रशासनाला विरोधात असणारी माणसं हवी नसतात तर त्यांच्या हो ला हो मिळविणारी माणसं हवी असतात. ते सत्तेत असतातही. परंतु त्यांच्या कोणत्याही विचारांना वाव नसतो. ते मत विचारात घेतलं जात नाही. तसा त्यानं प्रयत्नही केला तरी त्याचं चालत नाही आणि तसा विरोध करण्याचा प्रयत्न केलाच तर त्याला त्या मंत्रीपद मारुन हटवलं जातं. ते मंत्रीपदावरुन हटले की मग चूप बसतात. कारण त्यांना तेवढा विचार करायला लावणारा मेंदूच नसतो. तो मेंदू सक्रीय नसल्यानं सर्व समस्या निर्माण होते.

या सत्तेच्या दलदलीत जो व्यक्ती हुशार असतो. त्याला सत्ता एकतर मिळत नाही. कारण तो व्यक्ती ना चमचा असतो ना तो व्यक्ती चापलुसी करतो. अशावेळेस त्या व्यक्तीला वर जातांना वा मंत्रीपद मिळवतांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो. जर त्याला मंत्रीपद मिळालं तर त्याचा वापर तो जनतेच्या लाभासाठी पुरेपूर करुन घेतो. तो विरोध करतो वाईट धोरणाचा. परंतु अशानं त्याचा देशातील वाईट गोष्टीसाठी होत असलेला विरोध लक्षात घेवून त्याला मंत्रीपदावरुन हटवलं जातं. यातच त्या व्यक्तीच्या मनात सुडाची भावना वाढीस लागते व तो ते मंत्रीपद जाताच वाईट कामं करायला लागतो. मग तो देशहिताचाही विचार करीत नाही. या गणतीच चांगले चांगले हुकूमशहा झाले की ज्यांनी फक्त नि फक्त देशाला बरबाद केलं. त्यात लादेन, हिटलरसारख्या ब-याच लोकांचं नाव घेता येईल. देशात असेच काही मुर्ख. वरच्या वर्गाची आपल्यावर खप्पामर्जी होवू नये म्हणून यांची चमचेगिरी. हे झालं राजकारणातील. देशात असेच काही मुर्ख आहेत की जे आज सरकारी नोकरीत आहेत. ज्यांना काहीच येत नाही. परंतु चमचेगिरीनं व वशिलतेबाजीनं ते वरच्या पोष्टवर आहेत व हुकूमत गाजवत आहेत. तिही मंडळी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन आपल्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या व्यक्तीच्या हुशारीपणाचा फायदा करुन घेत नाहीत व आपल्या क्षेत्राचा विकास करीत नाहीत. उलट त्यांना अक्कल नसल्यानं आपल्याकडे आलेल्या अधिकाराचा गैरवापर करतात नव्हे तर अशा हुशार व्यक्तींना त्रास देत असतात. तसंच त्यांना संपविण्याचा विचार करीत असतात.

देशाचा नाही तर जगाचा विचार केल्यास जगात जसे असे कित्येक मुर्ख आहेत की जे ज्यांच्या हाती सत्ता आहे. ते सत्तेचा उपभोग घेतात. त्या सत्तेचा उपभोग घेत असतांना त्यांना सत्तेबद्दल काहीच समजत नसल्यानं ते त्या सत्तेचा वापर विलासीपण व चैन भोगण्यासाठी करतात. त्या चैन भोगाच्या परीस्थितीला ज्या ज्या लोकांनी विरोध केला. त्याला त्याला ती मंडळी संपवूनही टाकतात. परंतु अशानं व्यक्तीच संपत नाही तर ती सत्ताही संपते. विचारशक्ती शुन्य असल्यानं एखाद्या शत्रुनं आक्रमण केल्यास त्यांना काय प्रतिउत्तर द्यावं ते कळत नाही. मग शत्रुंचं आक्रमण थोपवता न आल्यानं ते राज्य आपोआपच शत्रुंच्या घशात जातं नव्हे तर त्या शत्रुंचा त्रास हा जनतेलाही होत असतो. हे का घडतं ? हे घडतं मुर्खपणानं. मुर्खानं संगत मुर्खाशीच केल्यानं असं घडतं.

सुसंगती सदा घडो असं म्हटलं जातं. चांगल्या माणसांच्या संगतीत चांगलेपण गवसतं, वाईटपण नाही. परीसाच्या संगतीत राहून लोखंडाचंही सोनं बनतं. चंदन जिथं असेल, तेथील परीसरही चंदनमय होतो. तशीच गोष्ट आहे हुशार माणसांची. हुशार माणसांच्या संगतीत बुद्धूही हुशार बनतो.

आज आपल्या इतिहासाचा विचार केल्यास जे काही शासक झाले. त्या शासकांपैकी जे विलासी व चैनबाजीचे शासक होते. ते राज्य लयास गेलं व त्या चैनबाज्याही लयास गेल्या. परंतु जे शासक हुशार होते. त्यांचे राज्य वाढले. कारण त्यांनी त्यांच्या राज्यातील हुशार लोकांचा फायदा आपला राज्यकारभारात राज्यकारभार चालविण्यासाठी केला. जसं अकबर बादशाहानं आपलं राज्य वाढवलं. कारण तो हुशार होता नव्हे तर त्यांच्या दरबारातील नवरत्नही हुशारच होते. त्याचा वापर त्यांना आपलं राज्य वाढविण्यासाठी झाला. म्हणतात की जेव्हापर्यंत बिरबल जीवंत होता. तेव्हापर्यंत अकबर टिकला. त्यानंतर म्हणजे औरंगजेबानंतर आलेले शासक हे चैनीचे असल्यानं एवढं वाढलेलं साम्राज्य लयास गेलं. तेच घडलं देवगिरीचा सम्राट कृष्णदेवरायांच्या राज्यात. त्यांच्या राज्यात तेनालीराम हुशार होता. तेव्हापर्यंत राज्य सुरक्षीत होतं. महत्वाचं म्हणजेच हुशार व्यक्तींमुळं राज्याचा विस्तारच होत नाही तर देशाचा विकासही होतो. परंतु त्याची पारख व्हायला हवी. त्याची पारख तोच करतो. जो हुशार असतो. परंतु असा हुशार व्यक्ती सत्तेवर बसायला हवा आणि त्यानं हुशार व्यक्तींनाच आपल्या मंत्रीमंडळात स्थान द्यायला हवं. तसाच त्या व्यक्तीच्या हुशार गुणांचा वापर करुन घ्यायला हवा. तरंच त्या राज्याचा विस्तार होवू शकतो वा त्या देशाचा विकास होवू शकतो. अन्यथा ते राज्य लयासही जावू शकते किंवा तो देशही लयास जावू शकतो. हा आहे हुशार लोकांचा महिमा. देशात मुर्ख लोकांची काही कमी नाही. ते जागोजागी सापडतात. परंतु हुशार. ते सापडत नाहीत, ते बोटावर मोजता येण्यासारखे आहेत. त्यांचा शोध घ्यावा लागतो. ते परीसरातच असतात. कोळशात लपलेल्या हि-यासारखे. परंतु त्यासाठी जडजवाहीर हवा की जो या कोळशात लपलेल्या हि-याचा शोध घेईल. तो शोध घेतल्या गेला की बस काम संपलं. तो हिराच कोहिनूर सारखा ठरतो. जो आपल्या देशाची शान वाढवीत असतो. महत्वाचं म्हणजे सत्ता ही अलीकडे स्वार्थाधिशांची मालमत्ता बनत चालली आहे. या सत्तेत लोभ तर एवढा चरणसीमेवर गेला आहे की ज्याबद्दल न बोललेलं बरं. तसाच राजकारणात रस उरलेला नाही. असं दिसत आहे. शरद पवारसाहेब हे गाजलेलं व्यक्तीमत्व होतं. ते हुशार व्यक्तीमत्व होतं. त्यामुळंच त्या काळात सहकार व कृषी क्षेत्र सुधारलं. तेच बाळासाहेबांनीही केलं व सत्ता वाढवली. त्या दोघांनीही उमेदीच्या काळात राजकारणाची धुरा पेलली सत्तालोभ का असेना, परंतु शरद पवारानं १९७० च्या दशकात आपले चाळीस आमदार फोडून मुख्यमंत्रीपद बळकावलं व पस्तीस वर्षाच्या काळात मुख्यमंत्रीपद मिळविणारा तो एक मोठा नेता बनला. चांगले कामं करण्यासाठी ते उचललेलं शरद पवार साहेबांचं पाऊल होतं. परंतु अलीकडं तसं राजकारण नाही. फक्त लोभ आणि इडीची भीती. यामुळंच आज सत्ताबदल व पक्षबदल होत आहे. यात पदलालसाही आहे आणि अभयही आहे. म्हणूनच हा पक्षबदल आहे. पर्यायानं सांगायचं म्हणजे पक्षबदल निश्चीतच व्हावा. कारण स्वतंत्र्य भारतानं आपल्याला स्वतंत्र्य विचार करायला संधी दिली आहे. परंतु ती संधी आपल्याला स्वतःला स्वतःच्या मनात लालसा निर्माण करुन आपला स्वार्थ साधण्यासाठी दिली नाही. तसंच घाबरण्यासाठीही दिलेली नाही. असा स्वार्थ साधून आपलाच विकास करण्यासाठी दिलेली नाही. तर ती संधी दिली आहे आपल्या देशाचा, आपल्या राज्याचा विकास करण्यासाठी. परंतु आज असं दिसतं की एका एका नेत्यांच्या घरची मालमत्ता अब्जोच्या घरात आहे. कुठून आला हा पैसा ? त्याचा विचार होणे गरजेचे आहे. तो विचार होत असतांना पटकन सत्ताबदल. ही बाजू जमेची बाजू नाही. हे झालं राजकीय लोकांचं. त्यांच्या घरी मालमत्ता आहे व जी मालमत्ता विदेशात असून गुप्त स्वरुपात आहे. परंतु तेवढीच मालमत्ता ही आम लोकांचीही आहे. ज्यांचे या राजकीय लोकांशी लागेबांधे आहेत. तेव्हा ही मालमत्ता कुठून येते ? ही मालमत्ता येते भ्रष्टाचार करुन. आपला देश हा भांडवलशाहीचा असून मुक्त व्यापाराचं उदात्त धोरण भारतानं स्विकारल्याने अशी मालमत्ता देशातील लोकांना गोळा करता येते व ज्याचे बळी राजकीय पक्ष ठरतात. तसंच त्या मुक्त व्यापाराच्या भांडवलशाही भट्टीत सामान्य जनता भरडली जाते. महत्वाचं म्हणजेच तुम्ही भीतीनं पक्ष बदलवा नाहीतर लालसेने. सामान्य लोकांना त्याचं काही घेणं देणं नाही. सामान्य लोकांचं एवढंच म्हणणं की चांगलं काम करा. आम्हाला चांगलं ते द्या. मुर्खासारखा व्यवहार करु नका. आम्हालाही हव्यात आमच्या मुख्य गरजा पुर्ण करणारे मंत्रीगण अन्न, पाणी आणि निवारा पुर्ण करणारे. आम्हाला स्वस्त अन्न, शुद्ध पाणी आणि राहायला लहानसं घर हवं ? ज्यात मायेचा ओलावा टिकावा आणि नात्याचे संबंध दृढ होतात. मायबापानं मुलांना ओळखावं व मुलांनी मायबापांना. बस एवढंच पुरेसं. कारण कोणीही कितीही मालमत्ता असली तरी उरावर मांडून नेत नाही. सगळं इथलं इथंच ठेवावं लागतं. हीच वास्तविकता आहे. मग कशासाठी हवी एवढी मालमत्ता ? हा विचार सत्ताधिशांनीही करणे गरजेचे आहे व त्यानुसार तसे पावले टाकणेही तेवढेच गरजेचे आहे. हे तेवढंच सत्य आहे. सत्ताबदल व्हायला हवं. परंतु मनबदल वा विचारबदल व्हायला नको ? कामं करण्यासाठी सत्ताबदल आवश्यक. तेही चांगली कामं करण्यासाठी. वाईट कामं करण्यासाठी वा भीतीसाठी वा सत्ताप्राप्तीसाठी सत्ताबदल नको. आपल्याला माहीत आहे की आपल्याच देशात भगतसिंग, राजगुरु व सुखदेवसारखे इतर बरेच क्रांतिकारक तसंच संभाजी राजेही मरण पावले. परंतु मनपरीवर्तन वा विचारसरणीत त्यांनी बदल केला नव्हता.

# मायबाप: महत्त्वाचा दुवा!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आपल्या देशात ० ते १९ वर्षांपर्यंत- जन्मापासून तर लग्नांपर्यंत आईवडील आपल्या मुलांमुलीचा सांभाळ करतात. त्यांना सरळ-चांगले चालणे-बोलणे, उठणे-बसणे, लिहिणे-वाचणे शिकवितात. त्यांच्यावर सुसंस्काराची उधळण करतात. एवढे का? तर आपली मुले कुठेही मागे राहू नयेत. ती जागतिक स्पर्धेत सरस ठरावीत, त्यांच्याबद्दल कटू व बदनामी कारक शब्द ऐकू येऊ नयेत. म्हणून स्वतः ज्या चाकोरीबद्ध मर्यादेत वावरत असतात, त्याच मर्यादापूर्ण चाकोरीत वागण्यास मुलांनाही बाध्य करीत असतात. आपल्या वंगाळ व विपरीत वागणुकीने आपला आदर्श परिवार, समाज, धर्म किंवा संप्रदाय कलंकित होऊ नये. म्हणून ते कडक शिस्त लावतात. मुलांना त्यांच्या या कडक शिस्तीचाच विट येतो.**

कारण त्यांना स्वैर, स्वतंत्र व स्वच्छंदीवृत्तीने विनानिर्बंध वागावेसे वाटते. म्हणून ते परस्परांच्या यौनसौंदर्यावर भाळून घर सोडून घरांपासून दूर पळून जातात. त्यांना ती शिस्त व मर्यादा खूप कटकटीची व कष्टप्राय वाटल्यानेच ते असे टोकाचे पाऊल उचलतात. जगाच्या पाठीवर कोठेही पळून गेले तरी ती ब्याद काही पाठलाग सोडत नाही, हे त्यांना नंतर हळुहळू कळू लागते. ते अविचाराने व मोठ्या हिंमतीने घरून निघून जाऊ लागतात तेव्हा भ्रम झालेला असतो की आपण कोणाच्याही मदती, सहकार्य, किंवा आधाराशिवाय सहज जगू शकतो. म्हणून ते आईवडिलाना किंवा नातलगांना न पुसता, न विचारता लग्न करतात आणि प्रपंचाच्या काटेरी पिंजऱ्यात आकंठ अडकतात. पुढे अशा आईवडिलांच्या उपकाराची, संस्काराची जाण नसलेल्या मुलांना या प्रपंचाचा काटेरी पाश सोसवत नाही आणि काही दिवसातच ते एकामेकांचा काडिमोड करून प्रेमवेलीवर फुललेले फूलही रस्त्यावर टाकून देतात. अरेरे! हे काय तुमचे माणुसकीचे जगणे झाले का ? विचारा स्वतःलाच.

यात त्यांच्या मायबापांचा काहीच दोष नाही, असेही पूर्णपणे म्हणता येणार नाही. काही अंशी तरी त्यांचाही येथे दोष आहेच. आपण पुत्र-पुत्रीचे बालपणीचे रुसणे-फुगणे सावरले, त्यांचे बालहट्ट पुरविले. तसेच काहीसे कलेकलेने घेतले असते, माणुसकीच्या नात्याने त्यांना समजून जवळ केले असते; तर आज ही अशी पुत्र-पुत्री वियोगाची वेळच आली नसती. मायबाप हाच खरा घरपरिवार, समाज, धर्म, आणि संप्रदायांतील महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे आपोआपच बदनामीला खिळ बसली असती. आपल्या उपस्थितीत आणि आशीर्वादामुळे त्यांचे प्रेमविवाह अधिकच यशस्वी व शोभायमान ठरले असते, एवढे मात्र खरे हं! आजही भारतातील अनेक राज्यात प्रेमविवाहांना खुल्या मनाने स्विकार केला जात नाही. भारतात अशी अनेक कुटुंबे आहेत, जिथे आजही प्रेमविवाहास परवानगी नाहीये. अशा परिस्थितीत कुटुंबातील कोणत्या सदस्याला प्रेम झालं तर ती त्याच्यासाठी एक मोठी समस्या बनते. त्यामुळे कुटुंबीयांची परवानगी मिळवण्यासाठी काही टिप्स कामी येऊ शकतात. जसजशी वेळ बदलत गेली तसतसे भारतीय संस्कृतीत लग्न या विषयामध्ये अनेक बदल होत गेले. आताच्या काळात प्रेमविवाह किंवा अरेंज्ड मॅरेज दोन्हीही अगदी सामान्य झाले आहेत. पण तरीही आज अशी बरीच कुटुंबे आहेत जिथे प्रेमविवाह करण्यास परवानगी नाहीये. जर तुमच्या घरातही असे काही नियम असतील आणि तुम्ही मात्र नकळत कोणाच्या प्रेमात पडला असाल; पण तुम्हाला आई-वडिलांच्या आशीर्वादानेच लग्न करायचे असेल तर या काही खास टिप्स तुमच्या नक्की कामी येतील. या टिप्स वापरुन तुम्ही आपल्या जोडीदाराची माहिती आई-वडिलांना देऊ शकता व त्यांची परवानगी मिळवू शकता. योग्य वेळेची निवडः जर तुम्हाला आधीच माहित असेल की ते लग्नाला विरोध करणार तर मात्र तुम्ही योग्य वेळ बघूनच हा विषय त्यांच्यासमोर काढणे उत्तम! अशा वेळेची वाट बघा जेव्हा घरातील वातावरण टेन्शन फ्री असेल आणि आई-वडिलांचा मुड देखील खूप चांगला असेल. अशी योग्य वेळ हाती लागताच बोलता बोलता त्यांना सांगा की तुम्हाला कोणीतरी आवडते आणि त्या व्यक्तीसोबतच तुम्हाला आयुष्य व्यतीत करायचे आहे.

मदत घ्याः आई-वडिलांना आपल्या प्रेमाबद्दल काही सांगण्याआधी एखाद्या अशा नातेवाईकाची मदत घ्या, ज्याचा आई-वडील खूप आदर करत असतील किंवा त्यांच्या शब्दाला घरात मान असेल. त्यांच्यासोबत मिळून ठरवा की हा विषय कसा तुम्ही आई-वडिलांसमोर मांडू शकता आणि कशी त्यांची परवानगी चुटकीसरशी मिळवू शकता. तसेच आई-वडिलांशी बोलायला जाताना या नातेवाईकालाही सोबत जरुर घेऊन जा. जेणे करुन परिस्थिती हाताबाहेर गेली अथवा पालक चिडले तर तो नातेवाईक सर्व परिस्थिती चलाखीने हाताळेल.

स्वतःला परिपक्व सिद्ध कराः हा मुद्दा सर्वात जास्त महत्वाचा असतो. कारण जर आईवडिलांना आपला मुलगा किंवा मुलगी स्वतःच्या आयुष्याचे निर्णय घेण्यास सक्षम आहेत, असं वाटत नसेल तर ते कधीच तुम्ही घेतलेल्या निर्णयास दुजोरा देणार नाहीत. म्हणूनच आईवडिलांचा विश्वास जिंकून त्यांना हे पटवून द्या, की तुम्ही स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास समर्थ असून तुम्ही एक परिपक्व व्यक्ती आहात. त्यामुळे तुम्ही लग्नासारखा निर्णय पूर्णत्वास नेऊ शकता. तरच ते तुमचे बोलणे गांभिर्याने घेतील.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बुलढाण्यात होमिओपॅथिक, आयुर्वेदिक, डेंटिस्ट भवन

## आ. संजय गायकवाड यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज




**बुलढाणा :** येथे वारकरी भवन, पत्रकार भवन, नाट्यभवन अशा विविध भावनांच्या मालिकेत बुलडाणा शहरात आता होमिओपॅथिक-आयुर्वेदिक डेंटिस्ट भवन उभे राहणार असून, आयटीआय कॉलेजच्या मागील परिसरात भवनाचे भुमिपूजन आ. संजुभाऊ गायकवाड यांच्याहस्ते रविवार ९ जुलै रोजी पार पडले. यावेळी वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते व होमिओपॅथिक डॉक्टरर्श असोसिएशनचे अध्यक्ष डॉ दुर्गासिंग जाधव व इंडियन डेंटल असोसिएशनचे डॉ शरद जुमडे यांनी आमदार संजुभाऊ गायकवाड यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी आ.संजय गायकवाड यांच्यासे युवानेते मृत्युंजय भ गायकवाड, शिवसेना जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश पांडे, मा. नगराध्यक्ष विठ्ठलराव येवले, किसान सेना जिल्हाप्रमुख संदीप गायकवाड, वाहतूक सेना जिल्हाप्रमुख राजेश मुंगळे, मधुकर पऱ्हाड, S. राजेंद्र वाघ, गजेंद्र दांदडे, भाजपा शहराध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, डे जालूभाऊ भाग्यवंत, डॉ. शोन चिंचोले आदी उपस्थित होते. बुलढाणा विधानसभा क्षेत्रांतर्गत आ. संजय गायकवाड यांच्या माध्यमातून समाज उपयोगी विविध इमारती उभ्या राहत आहेत, त्याच अनुषंगाने आरोग्य क्षेत्र सदृढ व्हावेत.. सर्व प्रकारच्या सुविधा या नागरिकांना मिळाव्या यासाठी होमिओपॅथी भवनासह आयुर्वेदिक भवन व डेंटिस्ट भवन आदी भवन उभे राहावे, अशी मागणी करण्यात आली होती. आपला दिलेला शब्द पूर्ण करत आ. संजय गायकवाड यांनी सदर इमारतीचा पायाभरणा केला लवकरच या सर्व इमारती बुलढाणा शहराचे नाव लौकिक वाढवण्यात भर वाढवणार आहेत ग्रामीण भागातील गोरगरिबांना या ठिकाणी सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यावेळी डॉ. मधुकर पऱ्हाड, होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. दुर्गासिंग जाधव, डॉ. पवन बजाज, डॉ. शरद जुमडे, डॉ. आशिष खाजबागे यांच्यासह होमिओपॅथी, डेंटिस्ट, युनानी, तसेच आयुर्वेदिक क्षेत्रातील डॉक्टर व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** रुळावरून चालत असताना युवकाच्या कानात हेडफोन होते. मागून धडधड करत मालगाडी आली. आवाज ऐकू न आल्याने शेवटी अनर्थच घडला. मालगाडीच्या धडकेत युवकाचा दुर्दैवी अंत झाला. जिल्ह्यातील माना-कुरूम स्थानकादरम्यान येणाऱ्या मंडुरा रेल्वे स्थानकानजीक रामटेक परिसरात ही घटना घडली.

परिसरातील रहिवासी ३५ वर्षीय आशिष भगवान गडलिंग हे रेल्वे रूळ ओलांडून जात असताना त्याच्या कानात हेडफोन होते. त्यामुळे दोन्ही बाजूने येणाऱ्या मालगाड्यांचा आवाज त्यांना ऐकू आला नाही. डाउन बाजूने येणाऱ्या मालगाडीची त्यांना जोरदार धडक बसली. त्यातच आशिष यांचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची माहिती माना पोलिसांना दिल्यावर त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मूर्तिजापूर येथील लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात पाठवला. याप्रकरणी माना पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.



# उरण येथे लोकसंख्या दिन कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** 11 जुलै जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियाना अंतर्गत निश्चय मित्र योजनेअंतर्गत , इंडियन ऑइल अदानी वेंचर लिमिटेड कंपनी उरण यांनी तालुक्यातील कोप्रोली व गव्हाण प्रा. केंद्र अंतर्गत असणारे क्रियाशील टीबी रुग्णांना त्यांच्या सी आर एस फंडातून कंपनीने 125 रुग्णांना सहा महिन्याकरता दत्तक घेऊन पोषण आहार व प्रोटीन युक्त धान्यचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी आयओटीएल कंपनीचे एस आर गणेशन, डायरेक्टर फायनान्स अतुल खराटे, भूपेश शर्मा, मिलिंद मोघे, संदीप काळे, श्रीमती नाजनीन शेख, प्रफुल्ल म्हात्रे, श्रीमती शिवानी राठोड तसेच या कार्यक्रमासाठी डॉक्टर वंदन कुमार पाटील जिल्हा क्षयरोग अधिकारी, समीर आठावकर गटविकास अधिकारी पंचायत समिती उरण, डॉक्टर राजेंद्र इटकरे तालुका आरोग्य अधिकारी उरण, डॉक्टर राज चव्हाण वैद्यकीय अधिकारी कोप्रोली, डॉक्टर अस्मिता बोंबटकर वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाण, डॉक्टर श्रीमती काजल लकडे वैद्यकीय अधिकारी नागरी आरोपी केंद्र उरण, तालुक्यातील सर्व वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणारे कर्मचारी आशा गटप्रवर्तक व ज्यांच्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता असे क्षय रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष परदेशी तालुका आरोग्य सहाय्यक उरण यांनी केले.

# अपघातात बालकासह एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** काही दिवसांपूर्वी चांदवड जवळील शिरवाडे वणी फाट्यावर भीषण अपघातात तीन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. आता पुन्हा याच चौफळीवर भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. ओम्नी कार आणि एर्टिगाच्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून, पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये तीन वर्षीय बालकाचा समावेश आहे. जिल्ह्यातील अपघाताच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असून सातत्याने अपघाताच्याघटना समोर येत आहेत. अशातच ब्लॅक स्पॉट म्हणून ओळख असलेल्या शिरवाडे वणी फाट्यावर पुन्हा अपघाताची घटना घडली आहे. रविवारी रात्री मोहन पगार हे नातलगांसह ओम्नी कारमधून नाशिकहून चांदवड तालुक्यातील वडनेरभैरव येथे जात होते. रात्री पावणे बारा वाजेच्या सुमारास ओमनी वाहन शिरवाडे वणी चौफुलीवर रस्ता ओलांडत असताना वडनेरभैरव कडे वळत असताना पाठीमागून येणाऱ्या एर्टीगा कारने ओमनीला जोरदार धडक दिली. या धडकेत ओमनी कार च्या डाव्या बाजूचा चक्काचुर होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला तर पाच जण जखमी असून त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यात इर्टीगा कारमधील भुसावळ येथील भूषण विठ्ठल धोटे यांच्यासह ओमनी कारमधील देवा सुमित पगार या तीन वर्षीय बालकाचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान दोन्ही वाहनातील मोहन शंकर पगार, मीना मोहन पगार, सुमित मोहन पगार, कैलास शंकर बराटे, स्वप्निल भगवान चौधरी, मयुरेश सुरेश बराटे हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर पिंपळगाव येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शिरवाडे फाटा चौफुलीवर अपघात झाल्याची माहिती मिळताच शिरवाडे फाटा स्पॉटवर उभी असलेली जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानची मोफत रुग्णवाहिका लागलीच अपघात स्थळी पोहोचली. यानंतर तातडीने रुग्णांना पिंपळगावला उपचारासाठी हलविण्यात आले. महामार्ग चौपदरीकरणात शिरवाडे वणी चौफुलीची रचना अपघाताला आमंत्रण देणारी ठरत आहे. सदोष रचनेमुळे येथे अपघाताची मालिकाच सुरु आहे.




महाराष्ट्र Business Katta












# सुशिक्षित कोणाला म्हणायचे ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सुशिक्षित कोणाला म्हणायचे हा प्रश्न वारंवार डोक्यात येतो. काही लोक असही म्हणतील जो शिकलेला आहे ज्याला लिहता वाचता येते तो सुशिक्षित आहे. एक किंवा अनेक विषयामध्ये पदवी प्राप्त केली, अनेक पुस्तके वाचले म्हणजे सुशिक्षित. असाच समज आपला झाला आहे. परंतु वास्तविक परिस्थिती पाहता सत्य परिस्थिती ही नाहीच. ज्याला लिहता वाचता येते, ज्याला अक्षर ओळख आहे आणि ज्याने पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेऊन कागदाचे ओझे फाईल ला केले, खाजगी किंवा शासकीय नोकरी करतो, खुप मोठा पगार घेतो म्हणजे सुशिक्षित नाही. त्यांना आपण फारफार तर लिहता वाचता येणारा एक व्यक्ती म्हणू शकतो. कारण शिक्षणाचा अर्थ खुप व्यापक व परिवर्तनकारी आहे. मग जे लोक संकुचित आणि स्वतः मध्ये काहीच बदल करत नाहीत त्यांना सुशिक्षित कसे म्हणता येईल.**

सुशिक्षित व्यक्ती हा विज्ञानवादी, समतावादी, न्यायवादी, तर्कवादी असतो म्हणून शिक्षीत लोकांना वेगळे स्थान असते. परंतु भारतामध्ये हजारो वर्षांपासून शिक्षण बंद होते फुले शाहु आंबेडकर यांच्या माध्यमातून भारतीय लोकांना शिक्षणाची सुरवात झाली. शिक्षणाची सुरवात झाली असली तरी शिक्षणाचा वापर केवळ नोकरी मिळवून स्वतः ची आर्थिक प्रगती करून घेणे एवढाच केला आणि शिक्षणालाच मर्यादित केले. शिक्षण हे प्रगतीचे साधन आहेच. परंतू केवळ आर्थिक प्रगतीचे साधन शिक्षण नाही. कारण आपण पाहतो अनेक उद्योजक कमी शिकलेले आहेत आणि सुशिक्षित लोकांना लाखों करोडो रुपयांचा रोजगार ते मिळवून देतात मग ठिकाणी जास्त पैसे कमवणाऱ्या उद्योजकांना सुशिक्षित व काम करणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांना अडाणी वा कमी शिकलेले म्हणायचे का ? मुद्दा हाच आहे की शिक्षण केवळ आर्थिक स्थिती सुधारत नाही तर सामाजिक, मानसिक परिवर्तन करून वैचारिक परिपक्वता निर्माण होऊन सत्य असत्यामधला फरक शिक्षणामुळे कळतो. आजही पदव्या घेतलेले लोक पाखंड, अंधविश्वास, जादुटोणा, अनिष्ट रूढी परंपरा, कर्मकांड यांच्या समोर झुकतात. विज्ञान, सत्य हे स्विकारण्याची त्यांची माणसिकता ही नसते. स्वतःला सुशिक्षित समजणारे लोकांना संत महापुरुषांचे विचार ही कळू नाही म्हणजे सुशिक्षित लोकांच्या बुद्धीची कीव येते. संत महापुरुषांनी अंधविश्वास, पाखंड, बुआबाजी पासून दुर राहण्यासाठी आयुष्यभर प्रबोधन केले परंतु आजही लोक पाखंडी व विषमतावादी भोदु लोकांच्या गोटात जाऊन बसतात. श्रद्धेला धर्माशी, व धर्माला देवाशी जोडून अंधविश्वास मजबूत करून घरात सुखशांती, जीवनात यश, मिळवण्यासाठी, ग्रह दुर करण्यासाठी लाखो करोडोंचा चुका पाखंडी शिकलेल्या व्यक्तीला लाऊन जातात. लोकांच्या श्रद्धेचा, लोकांच्या धार्मिक भावनेचा धंदा करणाऱ्या लोकांसमोर पदवीधर, डॉक्टरेट लोक नतमस्तक होतात तेव्हा त्यांची माणसिक गुलामी दिसून येते. एखाद्या नास्तिक व्यक्ती असेल, अंधविश्वास, पाखंड यावर याला न माणणारा व्यक्ती असेल तर त्याला धर्मविरोधी म्हणून निंदा केली जाते आणि जो देव धर्म यांच्या नावावर लोकांना लुबाडतो त्या पांखडी लोकांच्या पाया पडले जाते. ह्या घटना बघितल्या तर येथे तर्क, मेंदुचा वापर कधीच केला जात नाही. संत तुकाराम महाराजांपासुन संत गाडगेबाबा आणि शिव फुले शाहु आंबेडकर यांचे विचार जर वाचले तर खऱ्या अर्थाने शिक्षणाचे महत्त्व कळून व्यक्तीचा विकास कसा होतो याची जाणीव होते. परंतु स्वतः ला उच्च विद्या विभूषित समजणारे लोक संत महापुरुषांचे विचार व कार्य वाचत नाहीत स्वतः चा मेंदू वापरत नाहीत म्हणून भोंदु, पाखंडी व्यभिचारी लोकांना नतमस्तक होतात. अशा लोकांना सुशिक्षित म्हणतात च येणार नाही. हल्ली समोर आलेली घटना बघितली तर शिक्षणाची गुणवत्ता, मानसाची मानसिकता व धर्माच्या नावाखाली बनलेले गुलाम हे खुप चिंताजनक आहे. एका जोतीष्याच्या विरोधात एका इंजिनिअर ने २५ लाख रुपयांची फसवणूक झाली म्हणून तक्रार दाखल केली आहे. इंजिनिअर म्हणले की लोकांना सुशिक्षित विद्वान असेच वाटते परंतु एका इंजिनिअर ची पंचवीस लाखाची फसवणूक एक कमी शिकलेला जोतीष करू शकतो याचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे शिक्षणाचे महत्त्व न कळने व श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धा जोपासणे. घरात सुख समाधान नाही म्हणून लाखों रुपये खर्च करून सुख समाधान मिळण्याचा प्रयत्न इंजिनिअर करतो आणि तरीही मिळत नाही म्हणून फसवणूक झाली म्हणून गुन्हा दाखल करतो. सत्य बोलले की लोकांच्या भावना दुखतात, एका बरोबर सर्वांना च दोष देणे बरोबर नाही म्हणतात वगैरे वगैरे चालते. परंतु आपण सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेणे गरजेचे आहे. सुख समाधान जर जादुटोणा करून, पैसे खर्च करून मिळाले असते तर गोरगरीब झोपडी मध्ये सुख शांती दिसलीच नसती. ही गोष्ट ज्यांना कळत नाही त्यांच्या डोक्यातील मेंदुचा काय फायदा ? घरात सुख नाही याचा अर्थ नेमका काय, पैसा आहे पण सुख नाही. कारण पैसा नसता तर सुख मिळवण्यासाठी पंचवीस लाख खर्च केले नसते. आपल्या घरात, आपल्या जिवनात सुख कधी असते, आणि सुख कोणाला म्हणायचे हे ज्याला कळत नाही त्याला सुशिक्षित कसे म्हणायचे ? सुख हे मानण्यात असते. अनेक लोकांसमोर अनेक कठीण समस्या असुनही ते सुखी आहेत. आणि अनेक लोकांकडे सर्व काही असूनही ते दुःखी आहेत. मग आपल्याला सुख नेमके देतो कोण हे जर कळत नसेल तर त्या व्यक्तीला काय म्हणावं. धर्म, श्रद्धा व देवाच्या नावाखाली आपापल्या परिने वाटेल ते दान करून सुख मिळवण्याचा व देवाला लाच देण्याचा प्रकार हा मानसिक गुलामीचे लक्षण नाही का ? भोंदु पाखंडी लोकांना किती ही पैसा देव धर्म व अंधश्रद्धेच्या नावाखाली देताना मनाला समाधान वाटतं कारण ते पैसे घेणारा आपल्याला देव, धर्म आणि सुख दाखवतो. परंतु दुसरीकडे रस्त्यावर असलेले वयोवृद्ध, अपंग लोकांना खिशातून दहा रुपये काढून त्यांना देण्याची हिंमत होत नाही अथवा तेथे त्यांना मदत करणे, त्यांना दोन शब्द बोलले कमी पणाचे वाटते. तर ही शिकवन आणि प्रवृत्ती नेमकी आहे कोणाची. आणि यामध्ये सुशिक्षित नेमकं म्हणायच कोणाला. सुख मिळवण्याच्या नादात फसतो त्याला की सुख मिळवून देण्यासाठी लोकांना लुबाडतो त्यांना ? यात सुशिक्षित कोण ? बर दुसरी गोष्ट पैसे खर्च करूनही सुख मिळाले नाही म्हणून तक्रार दाखल केली, परंतु जर समजा सुख समाधन मिळाले असे मानले असते तर फसवणूक करणारा व्यक्तीच्या रोज पाया पडले असते. सध्या उघड झालेली ही पहिलीच घटना नाही अशा अनेक घटना उघड झाल्या, आणि रोज सुख,समाधान, शांती ग्रह दुर करण्यासाठी धर्म व श्रद्धेच्या नावाखाली लोकांची किती लुट होते हे नव्याने सांगण्याची गरज नाही. अनेकांना कळते हि लुट होत आहे परंतु बोलण्याची हिंमत करत नाही. कारण जर समोरच्या ला काही बोललो आणि त्याने काही जादुटोणा करून बरे वाईट केले तर काय होईल ही भिती असते. आणि असेच उदाहरण वारंवार सिद्ध करतात कि देव व देवाच्या नावाने कर्मकांड केवळ सर्वसामान्य लोकांना लुटण्यासाठी व पुरोहितांना जगवण्यासाठी च निर्माण केले. कारण आपण जर सर्व जन देवाचे लेकरे आहोत तर आपले सुख समाधान याची काळजी देव घेईल ना, जर काळजी घेणारा देव असेल तर पाखंडी भोंदु लोकांना पैसे देण्याचे काय काम ? देव पैसा घेऊन सुख समाधान देतो का ? जर तसे असते तर नास्तिक लोक सुखी नसायलाच पाहिजे. परंतु ते जास्त सुखी आहेत. कारण त्यांच्या मनात देव धर्म याबद्दल चुकिची भिती नाही. मानसाच्या जिवनातील दुखः दूर करून शांती व समाधान देण्याचा ठेका देवाने मध्यस्थी लोकांना दिला का ? देव धर्म अंधविश्वास यांच्या नावाखाली जो पैसा कमावला जातो त्या पैशाची देवाला गरज असते का ? होम हवन करून, महागडी पुजा अर्चा करून देव प्रसन्न होत असेल तर सर्व सामान्य गोर गरिब लोकांचा देव नाही का ? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. अडाणी लोकांची फसवणूक झाली तर आपण समजू शकतो पण स्वतः ला उच्च शिक्षीत समजणाऱ्या लोकांची पाखंडी, भोंदु लोक फसवणूक करत असतील, पाखंडी लोक बायका घेऊन पळत असतील, तर त्या शिक्षणाचा फायदा काय. मागे एका शिक्षीकेलाही घरात शांती राहील म्हणून हजारो रुपयांचा गंडा घातला गेला. सुशिक्षित लोक पाखंड अंधविश्वास व देवा धर्माच्या नावावर फसत असतील तर त्यांना सुशिक्षित म्हणण्याचे धाडस कसे होईल ?



# अरे अरे मना! तुझीच ही कहाणी !



मधुकर ए. निलेगावकर
संपर्क क्र.: ९४२१३७५६९१

आधुनिक केसरी

**माणूस म्हणून आपल्याला लाभलेले जीवन जगत असताना माणसाला जीवनात अनेक प्रकारच्या गोष्टींना, समस्यांना तोंड द्यावे लागते. अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पण, हे सगळे कशामुळे होते. याचा जर तुम्ही अगदी बारकाईने विचार केला आणि निरिक्षण केले तर तुम्हाला सहजच दिसून येईल की, या सर्व गोष्टींसाठी, या समस्यांसाठी माणसाचे मनच कारणीभूत आहे. या जगात सरळ स्वभावाची माणसे आपलं जीवन जगत असताना इतर कुणाच्याही खाजगी जीवनात हस्तक्षेप करीत नाहीत की, कोणत्याही बाबतीत ढवळाढवळ करीत नाहीत. आहे त्यात आनंद मानून ते त्यांचं जीवन सुखाने जगत असतात. पण, इतर जी काही माणसं अशी असतात की, त्यांना इतरांचं चांगलं चाललेलं देखवत नाही. अशी माणसं कुटुंबातील माणसामाणसात काहीबाही सांगून एकदूस-यात द्वेष, मत्सर पसरविण्याचे काम करतात.  त्यामुळे, चांगला विचार करणारी, चांगलं वागणारी माणसं अशा माणसांमुळे मनाने कलुषित होतात.**

त्यामुळे, त्यांच्या वागण्या, बोलण्यात मोकळेपणा राहात नाही. त्याकारणाने त्यांच्यात वितुष्ठता निर्माण होते.  यामुळे, काही कारण नसताना माणसा माणसांच्या जीवनात समस्या,अडचणी निर्माण होतात. त्यामुळे, अशा घातक स्वभावाच्या माणसांपासून दूर राहणेच हितावह असतं.  त्यासाठी, अशा दूष्ट प्रवृत्तीच्या माणसांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवण्याआधी त्यांची सत्यता पडताळून पाहिली पाहिजे. म्हणजे, विनाकारण, एकमेकांमध्ये गैरसमज निर्माण होत नाहीत. सत्यता पटल्यावर मग माणसाच्या आयुष्याची नाव सुखकरपणे चालू राहते. पण, एवढा संयम आणि एवढा वेळ वाट पाहायला सध्याच्या माणसांकडे एवढा वेळ नाही आहे. चहाड्या करणारे  तर त्यांचा  वेळ चहाडया करण्यातच वाया घालवतात. पण, सत्यता पडताळणीसाठी सुध्दा चांगल्या माणसांनाही वेळ नाही. त्यांनी हे न केल्यामुळे व चहाडखोर माणसांच्या खोडसाळपणामुळे, गैरसमजातून त्यांची चांगली माणसे त्यांना गमवावी लागतात. पण, याचा विचार मात्र सध्याची माणसं करीत नाहीत. मग, आयुष्यभर त्रास सहन करीत चांगल्या माणसांना मुकतात. हेच का या माणसांचं जीवन! म्हणून, माणसं ओळखायला शिकलं पाहिजे. व्यवहारज्ञान आणि शिक्षणानं मिळणारं ज्ञान यात खूप फरक आहे. व्यवहारज्ञान हे अनुभवाने मिळतं. पण, शिक्षणामुळे अनुभवज्ञान मिळतंच असं नाही. अनुभव घेतल्याशिवाय कोणत्याही ज्ञानात पारंगतता येत नाही. त्यासाठी,अनुभव घ्यावाच लागतो. अनुभव हा पैसे देवूनही विकत घेता येत नाही. " अनुभव हाही एक गुरू आहे". जसे आईबापही गुरु आहेत. तेही विकत घेता येत नाहीत. जीवन कसं जगायचं याचं शिक्षण, ज्ञान, आणि अनुभवाचे कथन तेच देतात. पण, मुलं मोठी झाल्यावर मात्र आईबाबांना विसरतात. अनुभवाच्या पाठशाळेत जीवनाचं शिक्षण मिळतं. आज तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे नवनवीन शोध लागत असल्यामुळे आजची तरुणपिढी तंत्रज्ञानात खूप अग्रेसर होवून त्यात निष्णात झाली आहे. पण, हे जरी खरे असले तरी त्यांना त्वरीत व्यवहारज्ञान येतेच असे नाही त्यामुळे, त्यांनी घाईने घेतलेल्या निर्णयामुळे त्यांची दूस-यांकडून फसवणूक होते. कारण, दूस-यांच्या गोड बोलण्यावर ही माणसं विश्वास ठेवतात आणि फसतात. त्यांना अनेकदा नुकसान सहन करावे लागते. याकामी त्यांना घरातील ज्येष्ठ असलेली मंडळीजसे,आईवडील आजीआजोबा त्यांचे नुकसान न होण्यासाठी सल्ला, मार्गदर्शन देवू शकतात. पण, आजची तरुणपिढी ते मानायला तयार होत नाही. अशिक्षित माणसांनी सुध्दा मोठमोठे उद्योग उभारले आहेत. हे इथं लक्षात घेतलं पाहिजे. त्यांच्या हाताखाली सुशिक्षित माणसे काम करतात. त्यांनाही आदर्श उद्योगपतीचे पुरस्कार मिळाले आहेत. कोणतंही काम असो,घरातील असो अथवा कंपनीतील किंवा व्यापारातील असो काम कसं करुन घ्यायचं यांचंही कौशल्य त्यांना आहे. त्यानुसार, जेष्ठ लोक मग ते सुशिक्षीत असो की अशिक्षित असो इतर लोकांकडून कामे करुन घेतात. ही मनाची भाषा आहे आणि ती या जेष्ठ लोकांना अवगत असते. कार्यालयाचे नियम तर असतातच. पण कधीकधी मनाचेही नियम वापरावे लागतात.या मनाच्या नियमात कधीकधी राग, प्रेम आणि आपुलकीही असते. ही मनाच्या प्रेमाची भाषा जर सगळ्यांनी शिकून घेतली तर कोणत्याही कुटुंबात वा कोणत्याही सार्वजनिक कार्यालयात वा कंपनीत कोणातही वादविवाद,भांडणे किंवा मारामा-या होणार नाहीत. पण, हे समजून घेतो कोण! या कलियुगात जो तो हमरीतुमरीवरच येतो. शिस्त,शांतता,श्रध्दा व सबुरीचं प्रमाण लोकांमध्ये खूप प्रमाणात कमी झालेले आहे. मना हे असे रे कसे! तुझ्या दूष्ट प्रवृत्तीचं लोक अनुकरण लगेच करतात. पण, चांगल्या मनाचं अनुकरण करायला मात्र, चालढकल करतात. खूप विलंब लावतात. पण, शुध्द मनाने देवाची भक्ती, उपासना केली तर त्या माणसांच्या हातून चांगली सत्कार्ये होतात. सर्व कामे चांगली होण्यासाठी माणसाच्या अंगी विवेक असावा लागतो. त्याच्या आधारे विचारपुर्वकपणे जेष्ठांची मदत घेवून योग्य निर्णय घेता येतात.  चंद्र हा मनाचा कारक आहे. चंद्रामध्ये जसा दिवसागणिक त्याच्या कलाकलांमध्ये बदल होत जातो. तसा, माणसांच्या मनामध्येही दिवसागणिक बदल होत जातो. म्हणून, माणसाचं अस्थिर,चंचल होत असतं. त्यामुळे, अस्थिर मनाने घेतलेले निर्णय, क्षणिक आलेल्या रागातून तिक्ष्ण,जहाल शब्दाने माणसे एक दूसऱ्याला, त्यांच्या मनाला दूखावतात. जी माणसे दूखावली गेलेली असतात.त्यांच्या मनात ती सल कायम राहते.औषधाने शरिराच्या जखमा ब-या होतात.पण, मनाच्या जखमा लवकर ब-या होत नाहीत. त्यावर, काळ हेच औषध आहे. काही कालावधीनंतर  मनाच्या त्या जखमा विसरणे, तसेच,त्या लोकांना क्षमा करणे हाच त्यावरील रामबाण उपाय व सुखी जीवनाचा मार्ग आहे. त्यासाठी, सर्व माणसांनी एकमेकांची मने जाणली पाहिजेत.ओळखली पाहिजेत.पतीपत्नीने,भावाभावांनी,भावाबहिणींनी तसेच, मुलांनी आईवडीलाप्रति एकमेकांशी प्रेमाने वागले पाहिजे. प्रेमाने संवाद साधला पाहिजे."मन करा रे प्रसन्न ।सर्व सिद्धीचे कारण । या उक्तीप्रमाणे आपले आचरण केले पाहिजे. याबाबतीत महाराष्ट्रातील सर्व संतांचे अनंत उपकार महाराष्ट्रातील व भारतातील सकल जनतेवर आहेत. थोर संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व त्यांच्या भावंडांना आणि जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज व इतर सर्व संतांना त्या काळातील दूष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी अतोनात त्रास दिला. त्यांच्या मनाला खूप वेदना दिल्या. तरी त्या सर्व संतांनी आयुष्यभर सर्व जनतेच्या कल्याणासाठीच अहोरात्र जनसेवेचे कार्य केले. आयुष्यभर ईश्वरचिंतन,ईश्वराचे नामस्मरण केले. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वरमाऊलीनी संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी परमात्म्याकडे पसायदान मागितले. त्या संतांच्या निर्वाणानंतर मग, सर्व लोक डोक्यावर ज्ञानेश्वरी आणि तुकाराम गाथा घेवून मिरवणुका काढून त्यांचा उदो उदो करु लागले.जयजयकार करु लागले. ही कसली आहे जनरीत!हे दूष्टजनांच्या मना! तेव्हा अशी कशी झाली तुझी वाणी! संतांच्या मनाची, दीन जनांच्या मनाची केलीस तू दीन कहाणी!हे दूष्टजनांच्या मना!प्रत्येक शतकातही तुझी वागण्याची हीच त-हा आहे. हीच कहाणी आहे. कधी बदलणार आहेस तू स्वतःला! तुझा दूष्ट स्वभाव सोडून एकदा बाह्य आरशात आणि अंतरंगाच्या आरशात स्वतःला नीटपणे न्याहाळून तर पाहा! म्हणजे, तुझ्या दूष्कृत्यांचा इतिहास तुझ्या डोळ्यांमोर तुला दिसेल. मग, तुझीच तुला लाज वाटेल. हे गांभीर्याने नीट लक्षात घे. याउपरही जर, तुला कांहीच वाटले नाही तर मात्र, तुझ्या जगण्याला आणि तुझ्या असण्याला काहीच अर्थ उरत नाही. काळ्या पाषाणाला पण, पाझर फुटतो पण, तुला फुटत नाही. कारण, कोळसा! किती जरी उगाळला तरी काळा तो काळाच राहतो.त्याच्याजीवनाला काहीच अर्थ नसतो. त्याचं जीवन निरर्थक असतं.त्याच्या सोबतीला कोणीच नसतं.हे आजच्या काळातीलमाणसाच्या मना! हे लक्षात घे. काळाबरोबर बदल!पण, चांगल्या अर्थाने बदल.काळ कधीचदूष्टपणा करीत नाही. कृतघ्न माणसे दूष्टपणानं, अधमपणानं वागतात. दूष्कृत्ये करतात आणि त्याचं खापर काळावर फोडतात.काळ हा माणसाच्या दूष्कर्मांची शिक्षा दूष्कृत्ये करणा-या माणसांना देतो. पण! काही काही वेळेस मात्र त्यांच्या दूष्कृत्यांची शिक्षा इतर सर्व माणसांनाही भोगावी लागते. जसे, करोना काळात जगातील कांही अधम, दूष्ट माणसांच्या दूष्कृत्यांमुळे सर्व जगात कोरोना व्हायरसची लाट आली. त्याचा परिणाम जगातील इतर सर्व जनतेला भोगावा लागला. जगात कोट्यवधी लोकांचे बळी गेले.त्यामुळे, लाखो कुटुंबातील मुले अनाथ झाली. कोट्यवधी लोकांचे व्यवसाय ठप्प झाले. तसेच, हजारो लोकांच्या नोक-याही गेल्या. याला कारण म्हणजे, कांही घातक कृत्ये करणारी माणसं!बुध्दीचा योग्य वापर न करता मनाच्या लहरी स्वभावातून केलेले त्यांचे विघातक प्रयोग आहेत. त्या प्रयोगाच्या स्फोटातून निरनिराळे दाहक आणि घातक वायूंच्या वातावरणातील प्रसरणामुळे अनेक ज्ञात,अज्ञात असे विषाणू निर्माण होतात. त्यांच्याच परिणामामुळे असे घातक रोग निर्माण होतात. त्यासाठी मनावर बुद्धीचा ताबा असला पाहिजे. तिक्ष्ण बुध्दीच्या वापराने केलेली कार्ये यशस्वी होतात. मनाच्या आणि पैशांच्या आहारी गेल्यामुळे दूष्ट, घातक वृत्तीच्याअशा  माणसांची बुध्दी गहाण पडली आहे. त्यामुळेच,या माणसांच्या हातून जाणतेपणीही अनेक दूष्कर्मे होतात. सत्तेवर असणा-या माणसांचाही बेजबाबदारपणाने निष्काळजीपणे घडणा-या दूष्कृत्यांकडे दूर्लक्ष करण्यामुळेही गुन्ह्यांचे व गुन्हेगारांचे प्रमाण वाढत आहे. शासकाने आपल्या मनावर ताबा  ठेवून सुबध्दीने योग्य निर्णय घेवून गुन्हेगारांना शासन करणे व आपला वचक बसविणे अत्यंत आवश्यक आहे. थोर राजे श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी हेच तत्व अंगिकारले होते. त्यानी सत्याचे आचरण करुन त्यांच्या स्वराज्यात योग्य न्यायाने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवली होती. मनावर नियंत्रण ठेवून सुबध्दीने त्यांनी स्वराज्याचे सुराज्य केले.त्यांच्या काळात सर्व रयत म्हणजे जनता सुरक्षित होती.रयतेला सर्वोच्च प्राधान्य थोर छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलं होतं.  हे आजच्या काळातील सत्ताधाऱ्यांनी, शासकिय यंत्रणांनी व सर्व माणसांनीही लक्षात घेऊन त्याप्रमाणे आपले आचरण केले पाहिजे. तरच, राज्यातील व या देशातील सर्व लोकांना लाभलेल्या स्वातंत्र्याचा आनंदाने व सुखाने ख-या अर्थाने उपभोग घेता येईल. याबाबतीत " गीत मनाचे " ही माझी कविता उद्बोधक ठरेल.

**" गीत मनाचे "**

**मनाने मनाला हासवावे जीवनी**
**मनाने मनाला जगवावे जीवनी**
**मनच धावते मनाकडे असे सदैव**
**जशी धावते नदी सागराकडे सदैव**
**तसे,जाणावे माणसाने माणसाला**
**द्यावा आनंद जीवनी एकमेकाला**
**मनामनाची आहे जीवनी ही कहाणी**
**जाणावी जीवनी निज अंतःकरणी**
**जो करतो जवळ सदैव माणुसकीला**
**असतो देवच पाठीराखा त्या मनुजाला**
**मनाची भक्ती असता नितांत थोर**
**मिटता नयन प्रभू दावी ब्रह्मांड थोर**
**जो जपतो नित्य देवाला,माणुसकीला**
**देतो आशिर्वाद भगवंत त्या भक्ताला**

# 'आईचा हात' जीवनावर मार्मिक भाष्य करणारी कविता

आधुनिक केसरी

**ग्रामीण आणि शहरी संस्कृती बरोबरच कृषी संस्कृतीचा परिचय करून देत जीवनावर मार्मिक भाष्य करणारी कविता कवी अ. म. पठाण यांनी आईचा हात या बालकुमार कविता संग्रहात लिहिलेली आहे. कवी अ. म. पठाण हे पैठण तालुक्यातील लोहगाव येथील असून व्यवसायाने ते शिक्षक आहेत. जिव्हाळा, वाजंत्री, अनाथ, मला शाळंत जायचं, पाणपोई, आईचा हात, हे कवितासंग्रह. गोदाकाठचे गावकुस हे ललित संग्रह. तर झुमरी, पाणक्या हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांना मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अनेक चँनलवरुन त्यांची ब्रॅण्डमास्टर ते शाळामास्तर अशी मुलाखत दिली आहे. आईवडिलांचा सन्मान तर गुरुजनांचा आदर कसा करावा? शेती, माती आणि निसर्गाच्या सानिध्यात राहून आपुलकीचे नाते कसे निर्माण करावे हे बालकुमारांना कवी कवितेतून सांगण्याचा प्रयत्न करतो आहे.**



दगडाला देव समजून पुजा करण्यापेक्षा माणसांने माणसात देव शोधावा. गाडगेबाबांचे विचार जसे आहेत तेच विचार आपल्या कवितेतून उभा करतो आहे. आईचा हात म्हणजे संकटकाळी पाठीवरती धीर देणारी सावली आहे. आईचा हात म्हणजे ममतेचा झरा आणि माणूसकीचा धर्म आहे.

**आईचा हात शिकवी भक्ती**
**दुःख निवारण्या देई सदा शक्ती**
**आईचा हात राबे दिनरात**
**अंधाराला दूर करी समईची वात**

कवी गुरुला महत्त्वाचे स्थान देतो. गुरूकडून आपल्याला खरे ज्ञान प्राप्त होते. तो नित्याने आदर्श पिढी घडवितो. तिमिरातूनी तेजाकडे वाटचाल करण्यासाठी गुरुंची धडपड एखाद्या देवदूतासारखी असते असे कविला वाटते. तर निसर्गावरही जीवतोडून अपार प्रेम करतो. हे निसर्गाचे वैभव पाहून ह्रदय माझे उमलून, भरुन येते असे कवी निसर्गाची ओळख करून देतो.

**आभाळ मजला हाक देई ढोल ढगांचा वाजत**
**राही मेघ वा-यासंगे धावून येई**
**मातीची तहान तृप्त होई**

रानातल्या मळ्यावर लळा लावणारा हा कवी झाड फुलांशी नाते सांगत पशू पक्षांशी बोलतो आहे. ग्रामसंस्कृतीचे विलोभनीय दर्शन कवी पहाटेचे वर्णन करताना करतो. गावाकडची सोनेरी सकाळ माणसांच्या मनाला कशी वेड लावणारी असते हे कवी लिहितो.

**झाडावर पक्षी किती करती किलबिलाट**
**सूर्याच्या उगवण्याची सारे बघतात वाट**
**गावच्या नदीवरून माय आणायाची पाणी**
**भरभर चालण्याचा आवाज पडतो कानी**

ही सकाळ म्हणजे कळ्या उमलण्याची आणि फुले मुक्या मनी हसण्याची वेळ आहे. जीवनाची मधूर गोड गाणी पक्षी गाऊ लागतात. तरुवर वेली वा-यासंगे झोका खेळू लागतात. अशा सुंदर प्रहरी बाप कष्ट करण्यासाठी जातो. हा माझा बाप जगाचा पोशिंदा आहे असे कवी म्हणतो.

**पेरतांना बी मातीत जाऊन रुते**
**हात जोडून मातीतून कोंब फुटे**
**पावसाने मोप पीक येईल यंदा**
**बाप आहे हा उभ्या जगाचा पोशिंदा**

धुंवाधार पाऊस काळ्या काळ्या रानात झिम्मा फुगडी खेळत कसा खेळतो आणि त्याच्या येण्याने मातीचा गर्भ वाढू लागतो. पाऊस कवितेत कवी वर्णन करतो. पर्वतांचे वर्णन करत त्याला प्रश्न विचारतो. तुम्हाला वारे कसे धडकतात ? तुमच्या अंगावर झाडे कशी ताठ उभे राहतात ? कवी लिहितो.

**पर्वतदादा पर्वतदादा असतात तुमच्या रांगा**
**अंगावर झाडे किती आम्हाला सांगा**

आनंदी जीवनाची खरी ओळख कवी करुन देतो.




जीवनातील तत्वे
पाळायला
शिकले पाहिजे.
स्वाभिमान
,देशाभिमान
बाळगायला
शिकले पाहिजे.
दुबळ्यांची सेवा
करावी. व्यथा
वेदनाना जाळायला
शिकले पाहिजे.
जीवनाचे सुंदर गाणे
कवी गातो आहे.

**स्वाभिमान बाळगावा**
**देशाभिमान वाढवावा**

घरचा दिवाळी सण आपण अनेकदा साजरा करतो. पण रानतली दिवाळी कवी साजरी करतो आहे.

दाटलेलेल्या नभाचा रानवारा
होई मु-हाळी
आनंदाने साजरी होई रानातली दिवाळी

रानमेवा, मामाच्या मळ्यात, नागपंचमी, मायमराठी, रानपाखरे, कळ्याफुले, विदूषक, रानमळा, आजोळची वाट, रानफुला इत्यादी कविता वाचनिय आहेत. आमराई म्हणलं की मुलांच्या तोंडाला पाणी येणारच! हिरव्या कै-या पाडून खातांनाचा आनंद वेगळाच असतो. पाडाला आंबे आले की माकडासारखी झोंबणारी मुलं झाडांच्या खांद्यावर चढतात. हे आमराईचे वर्णन कवी करतो आहे. मातृभूमी आणि मातृभाषा हे आपल्यासाठी खूप प्रिय आहेत. मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी सैनिक अहोरात्र सीमेवर लढा देत आहेत. आपण त्या सैनिकांना बळ देऊ या. उभारीचे पंख देऊया असे कवी म्हणतो.

जलक्रांती कवितेतून कवी पाण्याचे किती महत्त्व आहे तो कवी सांगतो. पाणी म्हणजे जीवन आहे. जपलं पाहिजे. पाणी टिकवून ठेवले पाहिजे. जल पुनर्भरण केले पाहिजे असे कवीला वाटते.

**थेंब थेंब पावसाने जल पुनर्भरण करुया**
**होणारी पाणी टंचाई कायमची दूर करुया**

झाडे लावली पाहिजे ती जगवली पाहीजे. फळे, फुले आणि सावली या बरोबरच पाऊस घेऊन येतात. पर्यावरणाचा दृष्टिकोन मुलांसमोर कवी ठेवतो. पाऊस पडला तर नदी माऊली काठ भरुन वाहत जाईल आणि वसुंधरेला आनंद होईल. रानमळे फुलायला लागतील. सुगी पिकल्या शिवाराला उधान येईल, शेतकरी आनंदी होईल. हा श्रावण हसायला लागेल असे कवी म्हणतो.

**उन्ह पावसाचा खेळ रानीवनी सुरु झाला**
**असा साजरा हसरा महिना श्रावण आला**
**रिमझिम बरसत हिरवा डोंगर न्हाला**
**शीतल वारा पिऊन महिना श्रावण आला**

नदी नाले, ओहळा माळातून, डोंगरद-यातून प्रवास करत कवींची कविता मानवी मनाबरोबरच बालमनाला आनंद आणि प्रेरणा देणारी नक्कीच आहे. कवींची कवितेला एक लय आहे,गोडवा आहे, मधुरता आहे. रानमळ्यात बहरणारी, झाडफुलांत बहरणारी, पीक पाण्यात, कणसात बहरणारी कविता ही मुलांच्या मनात बहरत राहणारी आहे. ग्रामसंस्कृती, कृषी संस्कृती ची ओळख करून देत मुलांना नवचैतन्याचा धडा देणारी आहे. आतील चित्रे व मुखपृष्ठ सरदार यांनी रेखाटले आहेत. संजय खाडे, श्रीकांत पाटील, ल. म. कडू, इंद्रजित भालेराव अनिल कांबळी यांनी सुंदर अभिप्राय दिला आहे. तर उत्तम कोळगावकर यांची कवितेला व कवी भावनेचा आशय समजून आशयात्मक अशी पाठराखण लिहिलेली आहे. कवींच्या पुढील लेखनास खूप खूप शुभेच्छा !

**आईचा हात (बालकुमार कविता) अ. म. पठाण**
**गाव पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृष्ठे ८०, कि. १००**
**प्रा. रामदास केदार, ९८५०३६७१८५**

# प्रियकर त्यांच्या प्रेयसीला इतक्या क्रूरपणे का मारतात ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**अलीकडच्या काळात अशा अनेक बातम्या समोर आल्या ज्यात प्रेमी युगुलांनी आपल्या मैत्रिणीची निर्घृण हत्या केली. पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ज्या मुलीवर त्याचं एवढं प्रेम होतं, त्याच मुलीला कोणी एवढ्या निर्दयीपणे कसे मारेल, हा मोठा प्रश्न आहे. गेल्या काही महिन्यांत प्रेम संपवून हत्येची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. यामागे मानसिक कारणेही आहेत. गेल्या काही काळात अशी अनेक प्रकरणे समोर आली आहेत, ज्यामध्ये प्रियकराने आपल्या प्रेयसीची इतकी निर्घृण हत्या केली की लोकांचा यावर विश्वास बसत नाही. एवढेच नाही तर हत्येनंतर पुरावे नष्ट करण्याचाही पुरेपूर प्रयत्न केला. गेल्या वर्षी आफताब आणि श्रद्धाचे प्रकरण बरेच दिवस चर्चेत होते. या प्रकरणात आफताबने सर्वप्रथम त्याची गर्लफ्रेंड श्रद्धा (श्रद्धा मर्डर केस) हिचा गळा आवळून खून केला. यानंतर, त्याचे ३५ तुकडे केले आणि अनेक दिवस फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर, हे प्रकरण समोर आले.**

काही दिवसांपूर्वी अशीच एक घटना समोर आली आहे, ज्यात साहिलने त्याच्या मैत्रिणी निक्की यादवचा गळा आवळून खून केला आणि चेहऱ्यावर कोणतीही सुरकुत न ठेवता, आपल्या कुटुंबाच्या पसंतीच्या मुलीशी लग्न करायला गेला. असाच एक प्रकार अलीगढमधूनही काही काळापूर्वी समोर आला होता, ज्यामध्ये प्रियकराने पहिल्या प्रेयसीची फिल्मी स्टाईलमध्ये हत्या केली होती. नंतर जीवही दिला.

या सगळ्या प्रकरणात एक गोष्ट कॉमन आहे, आधी प्रेम, नंतर फसवणूक आणि शेवटी खून. ज्याच्याशी तो काही काळापूर्वी प्रेम करत होता, त्याला अचानक एवढ्या क्रूरपणे कसे मारता येईल हा मोठा प्रश्न आहे. प्रेमाचे रूपांतर इतके द्वेषात कसे होते की त्याचा शेवट एखाद्याला मारण्यात होतो. जगभरात या संदर्भात अनेक संशोधने आणि अभ्यास झाले आहेत. मानसोपचार तज्ज्ञांच्या मते प्रेम, फसवणूक आणि नंतर खून यामागील शास्त्र काय आहे ? मेंदूमध्ये कोणते रसायन तयार होते, जे मारण्यास प्रवृत्त करते ? की यामागे आणखी काही कारणे आहेत ?

दोन व्यक्तींमध्ये प्रेम हे मानवी मेंदूमध्ये बनलेल्या रसायनांमुळे होते. दोन लोक एकमेकांच्या प्रेमात कसे पडतात ? सर्वप्रथम, दोन व्यक्ती एकमेकांच्या प्रेमात पडण्यामागील शास्त्र काय आहै ? जर्नल ऑफ कॉम्पॅरेटिव्ह न्यूरोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार , दोन व्यक्तींमधील प्रेम हे मानवी मेंदूमध्ये तयार होणाऱ्या रसायनांमुळे होते. जेव्हा दोन लोक प्रेम करतात तेव्हा त्यांच्या मेंदूमध्ये एक विशेष रासायनिक प्रतिक्रिया होते. यामुळे, हळूहळू दोघेही एकमेकांबद्दल अधिकाधिक विचार करू लागतात. एकमेकांशिवाय आजूबाजूच्या इतर लोकांना कमी चांगले किंवा वाईट वाटू लागते. जर्नल आर्काइव्ह्ज ऑफ सेक्शुअल बिहेवियरमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार , शरीरात डोपामाइनचे जास्त उत्पादन झाल्यामुळे दोन लोक फक्त एकमेकांबद्दल विचार करतात.प्रेमी फक्त एकमेकांचा विचार का करतात ?

अहवालानुसार, डोपामाइन आपल्या मेंदूला एका दिशेने सतत विचार करण्यास भाग पाडते. याशिवाय इतर सर्वांना चुकीचे बनवण्यासही हे रसायन कारणीभूत आहे. अनेकदा असे दिसून येते की दोन प्रेमळ लोकांना त्यांच्या जोडीदाराबद्दल बहुतेक वेळा बोलणे आवडते किंवा फक्त त्यांच्याबद्दलच विचार करत राहतात. जर्नल ऑफ पर्सनॅलिटी अँड सोशल सायकॉलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार, प्रेमात असलेल्या दोन व्यक्तींच्या शरीरात सेंट्रल नॉरपेनेफ्राइन रसायनाची जास्त प्रमाणात गळती झाल्यामुळे दोघेही एकमेकांबद्दलच्या आठवणींना उजाळा देत राहतात.

प्रेमसंबंध आणि फसवणूक करण्यामागील शास्त्र काय आहे, प्रेमात फसवणूक आणि खून करण्यामागील शास्त्र काय आहे, मानसशास्त्र, मानसोपचारतज्ज्ञ, मनोविकाराची लक्षणे, जेव्हा प्रेयसीला प्रेयसीपासून सावध राहावे लागते

दोन प्रेमीयुगुलांच्या विभक्त होण्यात कुठे काही केमिकल गुंतले असले तरी अनेक कारणे खुनाला कारणीभूत आहेत. दोन प्रेमीयुगुलांनी एकमेकांना का आणि कसे फसवले ? एकमेकांवर खूप प्रेम करणाऱ्या




दोन व्यक्तींना एकमेकांकडून सामान्यपेक्षा जास्त अपेक्षा असतात. त्यामुळेच अनेकदा प्रेमीयुगुलांमध्ये छोट्या-छोट्या गोष्टींवरून भांडण सुरू झाल्याचे पाहायला मिळते. खरं तर, ते आपल्या प्रियकराच्या छोट्याशा चुकीकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांची चूक त्यांना मोठी वाटते आणि त्यांना वाईट वाटू लागते. संशोधनानुसार, याचे कारण डोपामाइन उत्सर्जित करणारे न्यूरॉन्स सामान्यपेक्षा जास्त सक्रिय असतात. न्यूरॉन्सच्या अति सक्रियतेमुळे, प्रियकराच्या मेंदूचा एक भाग सांगू लागतो की त्याचा जोडीदार चांगला माणूस नाही. अशा स्थितीत तुम्ही तिसऱ्या व्यक्तीकडे आकर्षित होऊ लागतात.

दोन प्रियकरांमध्ये तिसरी व्यक्ती कशी येते ? जुन्या किंवा सध्याच्या जोडीदाराचे कितीही चांगले गुण दोन्ही प्रेयसींकडून तिसऱ्या व्यक्तीकडे आकर्षित झालेल्या जोडीदाराला सांगितले तरी तो एकतर आपल्या बोलण्यातून नवीन जोडीदाराला मध्ये आणतो किंवा त्याच्याबद्दल मनात विचार करू लागतो. नवीन प्रियकर मिळवण्याची इच्छा असणे किंवा फक्त त्याच्याबद्दल विचार करणे याला मानसशास्त्रात वेडसर वर्तन म्हणतात. जर्नल ऑफ सायकोफिजियोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासाच्या अहवालानुसार , वेड लागण्याचे प्रमुख कारण म्हणजे मेंदूतील सेरोटोनिन हार्मोनची पातळी कमी होणे. हा एक प्रकारचा मानसिक आजार आहे, ज्याला Obsessive Compulsive Disorder म्हणतात. प्रियकर त्यांच्या जोडीदाराला का मारतात ?

आता प्रश्न असा पडतो की दोन प्रेमळ माणसांचे विभक्त होणे किंवा तिसऱ्याकडे आकर्षित होणे हे आजकाल सर्रास झाले आहे, मग हे प्रकरण हत्येपर्यंत कसे पोहोचते. यावर मानसोपचारतज्ज्ञ डॉ.विपुल त्यागी सांगतात की, प्रियकराने प्रेयसीला मारण्याची अनेक कारणे असू शकतात. कोणत्याही एका रसायनाच्या पृथक्करणामुळे होणारी प्रतिक्रिया म्हणून ते मर्यादित करणे किंवा बंधनकारक करणे चुकीचे आहे. हे अतिचिंतेमुळे असू शकते. काहीवेळा परिस्थितीजन्य कारणांमुळे असू शकते जसे की मत्सर, पत्नीला विवाहबाह्य संबंधांमध्ये प्रियकराबद्दल कळण्याची भीती किंवा इतर कारणांमुळे. कधी कधी दुसऱ्या व्यक्तीसोबत पाहणे, संशय हे देखील याचे कारण असू शकते. एकूणच अशा प्रत्येक प्रकरणात खुनाची कारणे वेगवेगळी असू शकतात. यापैकी कोणतीही लक्षणे जोडीदारामध्ये दिसल्यास सतर्क राहावे, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

# नुसते वृक्षारोपण करण्यापेक्षा ती टिकवणे महत्त्वाचे

आधुनिक केसरी

सद्या जिकडे पाहावे तिकडे वृक्षारोपनाचे महत्त्व वाढताना दिसते आहे. कोणत्याही व्यक्तीचा वाढदिवस असो अगर उत्तर कार्य यावेळी इतर खर्चाला फाटा देऊन झाडे लावण्याचे महत्व सांगून बऱ्याच लोकांना झाडे वाटली जातात पण प्रत्यक्षात किती लोकांनी झाडे जगवली हा मात्र संशोधनाचा विषय आहे. पण दिवसेंदिवस वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड चे प्रमाण वाढत आहे,पावसाचे प्रमाण कमी होत आहे, प्रदूषण वाढत आहे, रोज एक आजार निर्माण होत आहेत नद्या तर गटार गंगा झाल्या आहेत. निसर्गचक्र बदल्यामुळे अशा संकटाना सामोरे जावे लागत आहे हे सर्व ठाऊक असून सुद्धा याकडे गांभीर्याने कोणी लक्ष देत नाहीत. पण संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांनी "वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे! पक्षीही सुस्वरे आळवित!"या प्रसिद्ध अभंगा द्वारे वृक्षाबद्दल प्रेमभावना व्यक्त करून जनजागृती केली आहे. तसेच प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी आपल्या गावी उभी केलेली देवराई यामध्ये महिलांचा मोठा सहभाग




आहे, याप्रमाणेच पद्मश्री पुरस्कारविजेत्या सन्माननीय सालुमर्दा थिमक्का यांनी 4 किलो मीटरवर 384 झाडे लावून त्याचे संगोपन केले आहे. तसेच आठ हजार इतर झाडांचे वृक्षांरोपण केले आहे. मूल नसलेल्या थीमक्कानी आपल्या मुलाप्रमाणे झाडांचा सांभाळ केला आहे. खरचं यामध्ये त्यांनी दिलेलं योगदान आदर्श आसच आहे त्यांना झाडांची आई म्हंटले तरी वावगे होणार नाही.दर वर्षी पावसाळा सुरू झाला की सरकार वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करून कोट्यवधी रुपयांची झाडे लावण्यावर भर देते पण नंतर त्याकडे लक्ष देत नाही ही शोकांतिकाच म्हणावी लागेल ? निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो कधी नाही म्हणत नाही. तरी सुद्धा आपण त्याचा विचार करत नाही. झाडे लावा झाडे जगवा ! नुसता म्हणायचे नाही तर कृतीत आणणे गरजेचे आहे. सध्या पावसाळा सुरू झाला असल्याकारणाने देशातील प्रत्येक राज्याच्या वनमंत्र्यांनी लागवडीचे उद्दिष्ट ठरवले असतील.ते पूर्ण करून त्याची जोपासना करणे गरजेचे आहे. आणि ही जबाबदारी प्रत्येकाची आहे. याची जाणीव ठेवली तर आपला देश पुन्हा सुजलाम् सुफलाम् व्हायला वेळ लागणार नाही !

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

# डॉ. आप्पाराव पडघान : 2 पिढ्यांशी मैत्री जपणारा वयोवृद्ध मित्र

आधुनिक केसरी

**खरं म्हणजे डॉ. आप्पाराव पडघान यांना मित्र म्हणावं अस माझं तरी वय नाही... वयाने, ज्ञानाने आणि सर्वार्थाने मोठे असणारे आप्पाराव काका माझ्या वडिलांचे खूप जवळचे मित्र. मी आदरणीय स्व. सुभाषरावजी झनक साहेबांकडे त्यांच्या मंत्रीपदाच्या कार्यकाळात स्वीय सहाय्यक असतांना स्व सुभाषरावजी झनक साहेबांना भेटण्यासाठी डॉ. पडघान मांगुळ झनक ला आले होते कुणीतरी त्यांना मी स्व. रा. ना. पवार यांचा मुलगा असल्याचे सांगितले आणि डॉ. आप्पाराव मला भेटण्यासाठी तिथेच खिळून राहले.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

माझ्या पाठीमागे कामाची लगबग, या अधिकाऱ्याला फोन लाव, त्या अधिकाऱ्याला कॉल करून साहेबांचे बोलणे करून देणे आणि लोकांची अडलेली कामे मार्गी लावणे तर कुठे कुणाला कुठल्या ना कुठल्या कामा संदर्भात पत्र लिहून देणें आणि त्यावर माननिय झनक साहेबांची स्वाक्षरी घेऊन ते पत्र संबंधितांना सुपूर्द करणे तर पुढील दौऱ्याचे नियोजन करून जिथे कुठे कार्यक्रम असेल त्या कार्यक्रमाचे नियोजन, आयोजकांचे कॉल घेणे, कंट्रोल रूम मधून येणाऱ्या कॉल वर साहेबांचे लोकेशन देणे, दुसऱ्या जिल्ह्याच्या हद्दीवर आमची वाट पाहून असलेल्या पोलीस गाडीला ,अजून निघायला अर्धा तास लागेल असे सांगून आमची प्रतीक्षा करत ताटकळत बसलेल्या पोलिसांना आधार देणे ही सगळी कामांची लगबग सुरू असतांना डोक्यावर टक्कल पडलेले मात्र पॅन्ट,शरटींग ,राहणीमानातील टापटीपपणा अस व्यक्तिमत्व असलेले डॉ आप्पाराव तेव्हढ्या गडबडीत माझ्याशी बोलले आणि तुझी गडबड झाली की, मला भेट तशी मला पण घाई आहे ,पण मला तुझ्या सोबत बोलायचे आहे. कधीच न बघितलेला गृहस्थ आणि थेट एकेरी बोलतोय यावरून या माणसाचे काही मंत्री महोदयाकडे काम असेल तर वडीलकीच्या वयाचे जरी असले तरी इतर लोकांसारखे कृत्रिम का असेना पण अदबीने बोलतील असा माझा मंत्री महोदयाकडे काम असलेल्या लोकांच्याप्रति अनुभव मात्र इथे याउलट दिसून आले एव्हड्या अधिकारवाणीने बोलणारा हा गृहस्थ मला जरा हटकेच वाटला आणि नंतर दुसऱ्या पी ए ला साहेबांसमोर ठेवून मी थोडा बाजूला होत त्यांच्याशी संवाद साधला. विशेष म्हणजे मंत्री महोदयाकडे कुणी आले आणि आपण बाजूला होऊन जर बोलतांना दिसलो तर कार्यकर्त्यांचे डोके खुपसने सुरू होते पी ए ला कुठल्या तरी कामासंदर्भात बोलल्या जात असून काहीतरी सेटिंग तर सुरू नाही न अशी भावना जोपासणाऱ्या कार्यकर्त्यांच्या नजरा टिपत निःसंकोचपणे मी त्यांना भेटलो कारण माझ्या साहेबांचा माझ्यावर असलेला विश्वास आणि तो कधीच ढळणार याची जाणीवपूर्वक काळजी घेण्याचा आणि असल्या प्रकारापासून दूर राहण्याचा माझा स्वभाव त्यामुळे मी त्यांना भेटलो आणि माझ्या खांद्यावर हसत हसत हात टाकून तू माझ्या मित्राचा मुलगा तुझा बाप रा. ना. पवार आणि मी खूप जवळचे मित्र आणि वडिलांच्या आठवणी,वडिलांचे वक्तृत्व, त्यांच्या अंगी असलेली हुशारी,राजकारण्यांनी त्यांचा केलेला वापर, त्यांचं झालेलं अपरिमित नुकसान हा वडिलांचा संपूर्ण प्रवास सांगत असतांना वक्तृत्वाच्या बाबतीत तू बापाच्या पायावर पाय टाकला असे म्हणून त्यांनी माझे कौतुक केले. माझी व त्यांची ही 2009 मधली पहिली भेट आणि त्यानंतर त्यांच्याशी बोलणे,भेटणे एव्हढेच नव्हे तर त्यावेळी आता सारखे अँड्रॉइड मोबाईल नसतांना ते जेव्हा अमेरिकेत आपल्या मुलीकडे असायचे त्यावेळी संगणकावरून त्यांना व्हीडिओ कॉल करून त्यांच्याशी वार्तालाप करणे त्यांच्याशी बोलत असतांना आता इकडे रात्रीचे इतके वाजले,आपल्या देशात आता किती वाजले ते अचूक सांगून किती तासांचा फरक आहे इथं पासून तर काकू ला बोलवून ही तुझी काकू,मग मुलीला बोलवायचे त्यांच्याशी परिचय करून द्यायचा, मुलीकडे माझी स्वतंत्र रूम, इंटरनेट ह्या सगळ्या सुविधा तर मुलीने केलेला आंतरजातीय विवाह आणि त्यांचा संसार कसा सुरळीत सुरू आहे इथपासून, का रे सिद्धेश्वर हा अमुक काय करतो असे एखाद्या विषयी विचारून त्याच्या बाबतीतली इत्यम्भूत माहिती मला देऊन त्या व्यक्तीविषयी,त्याच्या प्रकृती विषयी सगळं माझ्या कडून जाणून घ्यायचे

अधून मधून त्यांना कॉल करण्याची जणू काही मला ओढच लागली होती माझ्या पत्नीला बोलतांना तू खूप मोठ्या माणसाची सून आहेस तुझा सासरा खूप मोठा होता तत्कालीन आमदार जगाराव चव्हाण व माझे वडील रूम मेट आणि बी एड ला सोबत होते त्यामुळे जगारावजी चव्हाण सोबत बाबांची दृढ मैत्री आणि डॉ. आप्पाराव पडघान यांच्याशी पण मैत्री,परंतु डॉ आप्पाराव काकांचे आणि जगाराव काका चव्हाण यांचे काही सुत जुळेना.



त्यातूनच चव्हाण काकांनी डॉ आप्पाराव यांची केलेली बदली आणि त्यातून दोघांमध्ये निर्माण झालेला संघर्ष आणि त्या संघर्षात त्या दोघांमध्ये बाबांनी घालून दिलेला समेट आणि डॉ आप्पाराव यांची उचलून धरलेली बाजु आणि जगाराव काका चव्हाण हे बाबांचे मित्र असल्याने आणि ते दोघे एकमेकांशी एकेरी भाषेत बोलत असल्याने बाबांनी डॉ पडघान यांची बाजू पकडून त्यांना हवं असलेले ठिकाण मिळवून दिले आणि नंतर डॉ आप्पाराव काका व जगारावजी चव्हाण काका यांच्यातील गैरसमज दूर होऊन त्यांचे कसे सलोख्याचे संबंध निर्माण झाले आणि त्यात रा ना पवार यांची किती महत्वाची भूमिका होती हा किस्सा त्यांनी मला त्यांच्या शब्दात सांगितला. चेअरमन साहेब अर्थात स्व. आयाजी पाटील यांचा माझ्या वडिलांवर किती विश्वास होता इथपासून तर तुझ्या बापाने उपशिक्षणाधिकारी पदाचा राजीनामा द्यायला नको होता मात्र त्यांनी राजीनामा दिला नसता आणि सुल्तानपूर ला शिवाजी हायस्कूल वर हेडमास्तर म्हणून गेले नसते तर तेथील शिवाजी शिक्षण संस्थेला शाखा कशी गमवावी लागली असती हा सगळा किस्सा पडघाण काकांनी मला सांगितला.

जुन्या आठवणींचे खूप मोठे गाठोडे असलेले डॉ. आप्पाराव गेल्याचे मराठा सेवा संघाचे अध्यक्ष युगपुरुष आदरणीय शिवश्री पुरुषोत्तम जी खेडेकर साहेबांकडून समजले आणि वाईट वाटले आप्पाराव काकांविषयी काहीतरी लिहावं हा आदेशच त्यावेळी साहेबांनी मला दिला आणि आप्पाराव काकांच्या आठवणींचे गाठोडे सुटले.

आप्पाराव काकांची आणि माझी भेट शेवटची झाली ती आदरणीय शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर साहेब व आदरणीय सौ रेखाताई खेडेकर साहेबांसोबतच 2014 च्या दरम्यान रेखाताईंनी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाभर निवडक लोकांच्या भेटी घेणे सुरू केले होते.

डॉ. आप्पाराव सोबत होते.

त्यांनी मला कॉल केला व मी रेखाताईंना घेऊन तुझ्याकडे येत आहे असे सांगितले व आम्ही आता डॉ. खडसे साहेबांकडे जाणार आहोत,तू शिवाजी नगर ला त्यांच्या कडे ये असे मला सांगितल्याने क्षणाचाही विलंब न लावता मी त्यांना तसेच साहेबांना व ताईला भेटायला गेलो नंतर ते माझ्या घरी देखील आले.

जिथे जिथे गेलो तिथे तिथे आप्पाराव काका त्या त्या व्यक्तीविषयी रेखाताईंना माहिती द्यायचे.

ती व्यक्ती परिचयाची जरी असली तरी रेखाताई त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायच्या. साहेब हळूच त्यांची गम्मत करत त्यांना जास्त वेळ घालवू नका असे सांगायचे व ते हसत हसत गप्पा थांबवायचे आणि नेक्स्ट टाइम म्हणून विषय आटोपता घ्यायचे. त्यानंतर किशोर मापारी यांच्या कडे दुःखद घटना घडली,तेव्हा मी माननीय खासदार प्रतापराव जाधव यांच्या समवेत किशोरभाऊ मापारी यांच्याकडे गेलो,त्यांचेच जावाई असलेल्या आप्पाराव काकांची ती भेट शेवटची भेट ठरली तिथे दुःखद प्रसंग असल्याने आणि खा जाधव व आम्ही सांत्वन भेटीसाठी आल्याने गप्पांची मैफिल रंगली नाही मात्र इंग्रजीवर प्रभुत्व असलेल्या आप्पाराव काकांचा नेक्स्ट टाइम कधीच आला नाही. मोबाईल वर भेटी होत गेल्या पण प्रत्यक्षातली ती भेट शेवटचीच ठरली. स्व. आप्पाराव काकांना भावपूर्ण श्रद्धांजली

# निसर्गाच्या गंधाने बालमनाला गंधित करणारा कवितासंग्रह : पाऊस पाणी हिरवी गाणी

आधुनिक केसरी

मराठी बालसाहित्यात कसदार लेखन करणारे बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी कथा, कविता या लेखन प्रकारांत विपूल लेखन केलेले आहे. त्यांचा "पाऊस पाणी हिरवी गाणी" हा बालकवितासंग्रह अलीकडेच प्रकाशित झालाय. दिलीपराज प्रकाशनने प्रकाशित केलेला हा सचित्र बालकविता संग्रह बघताच क्षणी बालवाचकांना आपल्याकडे आकर्षित करतो. या संग्रहाची आकर्षक सचित्र मांडणी, उत्कृष्ट बांधणी आणि तितक्याच दर्जेदार कविता वाचकाला वाचनासाठी आकर्षित करतात. हा बालकवितासंग्रह एकूण ४७ बालकवितांनी सजला आहे.

कवितासंग्रहाच्या नावातच असलेला मुलांना आकर्षित करणारा पाऊस कविता वाचताना निसर्गाच्या गंधाने बालमनाला न्हाऊ घालतो. लहान मुलांच्या भावविश्वात वावरणाऱ्या या कविता बालवाचकाला आपल्याशा वाटतात. या बालकवितासंग्रहाची सुरुवात 'आपणही व्हावे...' या कवितेने झालेली आहे. बहरलेले झाड, उंच उंच पर्वत, खळाळणारा झरा, रोज उगवणारा सूर्य, विशाल आभाळ बघितल्यावर त्यांच्यासारखे आपणही उदात्त होण्याची भावना बालमनात अंकुरायला सुरुवात होते. अवतीभवती आढळणाऱ्या निसर्गातील गमतीजमती, पक्ष्यांचे स्वभाव, पावसात होणारा झाडांचा नाच, बी रुजून जन्मलेले झाड वाढताना बघून बालमन हरखून जाते.




'पोपटाची गोष्ट' ही कविता चिऊताई, कोकीळ, कबूतर, कावळा या पक्ष्यांच्या स्वभावगुणांची ओळख करून देते. बालवयात हवेहवेसे वाटणारे 'मित्र', गाईगुरांवर जिवापाड माया करणारी खेडेगावातील मुलं, सायकलीने फेरफटका मारणारी 'माझी सायकल' या कविता बालवाचकाला आपल्याशा वाटतात. 'आजोळचे गाव' ही कविता आजोळच्या आठवणीत रममाण करणारी आहे. आजोळची भेट माणसाच्या मनातील सर्व मरगळ दूर पळवून लावते. या कवितेत कवी आजोळची महती सांगताना लिहितात,

***येता आजोळी भेटाया, जाते मरगळ विरून***
***उत्साह, चैतन्य सारा, घेतो उरात भरून***

चवीने खाऊ, मिरची पुराण, गोड आठवणी, जपा तेवढं बरं, काळी मैना या कविता वाचकाला फळांचे गुणधर्म, त्यांच्या चवींची रंजकपणे ओळख करून देतात. गोष्ट सांगते आई या कवितेत वाल, हरभरा, मूग, मटकी, वाटाणा अशा कडधान्यांचे अन्नातील महत्त्व ते पटवून देताना लिहितात...

तोंडाला चव नसेल तर, म्हणे एक गोष्ट करावी
***चमचमीत उसळीची चव, एकदा तरी घ्यावी***
***वाल, हरभरा, मूग, मटकी, हुलगा, वाटाणा, चवळी***
***तूर, घेवडा, उडीद, मसूर, नेहमी वापरावीत सगळी***
***मुबलक प्रथिने त्यात, जीवनसत्वे तर भरपूर***
***पचनक्रिया सुधारून, आजारांना ठेवती दूर***

माणूस आणि निसर्ग यांचे नातेच अतूट असे आहे. निसर्गाशिवाय मानवी जीवनाचे अस्तित्त्व नाही. निसर्ग माणसाला आपल्याकडील आहे ते सारे भरभरून देत असतो. या निसर्गाच्या उदात्त स्वभावाचे दर्शन हा बालकवितासंग्रह वाचताना पानोपानी घडते. मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या निसर्गरूपी पुस्तकाचे पान नदीचे गाणे, तारा आमचा न्यारा, दोस्त त्यांचे होऊ, निसर्गसखा, प्रियंवदा, पाणी हेच जीवन, ऊर्जावान ऋतू, ढगोबा... या कविता अलगदपणे उघडतात. या कवितांतून निसर्गाबद्दलचा आदर बालमनावर बिंबवण्यात कवी यशस्वी ठरले आहेत.

निसर्ग हा विविधांगी रंगाने नटलेला आहे. अशा रंगांचे जेव्हा भांडण होते, तेव्हा होणारी धमाल 'रंगांचे भांडण' या कवितेतून सांगताना कवी लिहितात...

***एकदा रंग आभाळात, एकमेकांना भेटले***
***गर्वाने आपले मोठेपण, सांगतच सुटले***
***हिरवा म्हणे दिसे मी, गवत, झाडे, पानात***
***सर्वांहून मोठा मी, हिरव्या हिरव्या रानात***
***पिवळा रंग ओरडे, सूर्याला रंग माझा***
***जगाला देई ऊब, सर्वांचा मी राजा***
***पाऊस म्हणे रंगांना, भांडण आता पुरे***
***कमेकांना पूरक तुम्ही, हेच आहे खरे***

आगळीवेगळी शाळा, चैत्रपालवी, रंगला खेळ, नवी पालवी यासारख्या कविता बालमनात निसर्गाविषयीच्या जाणिवा वृद्धिंगत करण्यास उपयुक्त आहेत. झाड हसले ही कविता वारा, आभाळ, कळी, पाखरे यांच्याशी मैत्री निर्माण करणारी आहे.

एकनाथ आव्हाड यांच्या लेखनीतून आकारास आलेला हा कवितासंग्रह बालमनाची निसर्गाशी नाळ घट्ट जोडून ठेवणारा आहे. या बालकवितासंग्रहाला प्रसिद्ध बालसाहित्यिक, कवी उत्तम कोळगावकर यांची प्रस्तावना लाभली असून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, प्रसिद्ध साहित्यिक फ. मुं. शिंदे यांनी या बालकवितासंग्रहाची पाठराखण केली आहे. दिलीपराज प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या बालकवितासंग्रहाचे मुखपृष्ठ तसेच अंतर्गत सजावट प्रसिद्ध चित्रकार संतोष घोंगडे यांनी केली आहे. संपूर्ण सचित्र रंगीत असलेला हा संग्रह बालवाचकांना आवडेल असाच आहे.

**पुस्तकाचे नाव - पाऊस पाणी हिरवी गाणी (बालकवितासंग्रह)**
**पुस्तकाचे कवी - एकनाथ आव्हाड**
**प्रकाशक - दिलीपराज प्रकाशन, पुणे**
**पृष्ठे - ६४**
**मूल्य - १७०**

गुलाब बिसेन, मो.नं. 9404235191

# साखर आणि माती

आधुनिक केसरी

एक दिवस, बादशहा अकबर यांच्या दरबार भरलेला होता, तेव्हा एक दरबारी हातात काचेची बरणी घेऊन आला.

बादशहाने विचारले - 'या बरणीत काय आहे ?' दरबारी बोलला 'यात माती आणि साखरेचे मिश्रण आहे.' ते कशासाठी ?' अकबर बादशहाने पुन्हा विचारले. 'माफी असावी, महाराज' दरबारी बोलला. 'आम्ही बिरबलच्या बुध्दिमत्तेची परीक्षा घेऊ इच्छितो, आमची अशी इच्छा आहे की त्यांनी मातीतून साखरेचा दाणान दाणा वेगळा करावा.'

बादशहाने बिरबलकडे बघितले आणि स्मितहास्य करीत बोलले 'हे बघ, बिरबल तुझ्यासमोर रोज नवीन आव्हान असतात, आम्हाला असे वाटते की तू पाणी न वापरता मातीतून साखर वेगळी करावी.'

'हे तर खूपच सोपे आहे, महाराज.' बिरबल बोलला. 'हे तर लहान मुलांच्या खेळासारखे आहे', असे म्हणत बिरबलने बरणी उचलली व तो दरबाराच्या बाहेर निघाला आणि दरबारी देखील त्याच्या मागे गेले. बिरबल बागेत गेला व तिथे त्याने एका आंब्याच्या झाडाच्या सभोवताली बरणीतील साखर व मातीचे मिश्रण पसरविले.

'हे तुम्ही काय केले ?' एका दरबाऱ्याने विचारले. 'याचे उत्तर तुम्हाला उदया मिळेल.' बिरबल बोलला. दुसऱ्या दिवशी ते सर्वजण बागेतील त्या आंब्याच्या झाडाजवळ पोचले, तिथे फक्त माती पडलेली होती. साखरेचे सर्व दाणे मुंग्या गोळा करून आपापल्या वारूळात गेल्या होत्या, काही मुंग्या अजूनही साखरेचे दाणे घेऊन जाताना दिसत होत्या. 'परंतु सगळी साखर कुठे बरे गेली ?' दरबाऱ्याने विचारले. 'मातीपासून वेगळी झाली.' बिरबल बोलला. सर्व हसायला लागले.

बादशहाने सर्व दरबाऱ्यांना सांगितले, 'जर तुम्हाला साखर पाहिजे असेल, तर मुंग्यांच्या वारूळात जाऊन बघा.' सर्वजण जोरात हसायला लागले.




नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.

संपर्क : मो. 7588818406

# राजकारणाच्या चिखलावर मनसेतर्फे 'एक सही संतापाची'

## धर्माबाद येथे स्वाक्षरी मोहिमेस नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद:** महाराष्ट्राच्या राजकारणाचे झालेल्या चिखलावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी ' एक सही संतापाची' ही मोहीम राज्यभर राबविण्याचे निर्देश मनसेसैनिकांना दिले आहेत. कृष्णकुंजवरून निघालेल्या आदेशाचे पालन करत धर्माबाद शहरांमध्ये मनसे तर्फे 'एक सही संतापाची' मोहीम राबवली जात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात कोणता पक्ष कोणाच्या आघाडीत आहे हेच सामान्य जनतेला कळत नाही.अवघ्या चार वर्षात महाराष्ट्राने तीन मुख्यमंत्री बघितले आहेत. महत्वाचे म्हणजे ही आघाडी - युती नीती, राजकीय मूल्य, विचारधारा पायदळी तुडवून होतं आहेत. या तत्वशून्य राजकारणाचा लोकांना वीट आला असून सामान्य लोकांच्या मनामध्ये या राजकारणाविषयी असंतोष धुमसत आहे. या संतापाला वाट करून देण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सुरू केलेल्या 'एक सही संतापाची' अभियानाला धर्माबाद पानसरे चौक येथे शहरातील नागरिकांकडून आज उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मनसेने उभारलेल्या फलकावर सह्या करून सामान्य नागरिकांसह मनसे कार्यकर्त्यापासून आपला संताप व्यक्त करीत या फुटीर राजकारण्यांचा निषेध केला. लोकांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आपल्या विधानसभा सदस्यांना पक्षाच्या नेतृत्वाकडे, विचारधारेकडे बघून यांना निवडून दिले मात्र हे आमदार जनतेच्या विश्वासाला तडा देत कोणी गुवाहाटीला गेले तर कोणी अचानक विरोधी पक्ष सोडून मंत्री पदाची शपथ घेत आहे.
महत्वाचे म्हणजे ज्याना पक्षाची विचारधारा, नेतृत्व मान्य नसेल त्यांनी पक्ष सोडून, आपल्या आमदाराकीचा राजीनामा देऊन जनतेच्या दरबारात जायला हवं मात्र तसे होताना दिसत नाही. विकासाच्या गप्पा मारल्या जात आहेत. सत्तेच्या माध्यमातून नेमका जनतेचा विकास होतो की नेत्याचा ह्याचा शोध घ्यावा लागेल.मनसेच्या या आगळ्यावेगळ्या आंदोलनास लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.
या मोहिमे प्रसंगी सचिन रेड्डी चाकरोड, ( मनसे शहराध्यक्ष ) दत्तात्रय कावडे,( मनसे तालुकाध्यक्ष ) सतीश पाटील माळगे, रणजीत सिंह ठाकुर, नागनाथ पाटील माळगे, शिवानंद तोटलोड, अजय फडसे, पवन पाटील काळे व पत्रकार बांधव, धर्माबाद तालुक्यातील मनसे प्रेमी व कार्यकर्ते, नागरिकांनी देखील मोठ्या प्रमाणात स्वयंस्फूर्तीने उपस्थित होते.




महाराष्ट्राचे वर्तमान राजकारण हे विश्वासघातकी झाले आहे .मतदार मतदान करताना जसे व्यक्तीला बघून करतो तसेच तो पक्ष व त्या पक्षाची विचारधारा ही बघतो .मात्र आमदार, खासदार जनते गृहीत धरतं आहेत .जनता योग्य वेळी त्यांना धडा शिकवेल .
**सचिन रेड्डी चाकरोड, मनसे शहराध्यक्ष**

राजसाहेब ठाकरे यांनी हाकेला प्रतिसाद देत आम्ही हा उपक्रम राबवित आहोत . लोकांचा मिळत असलेल्या प्रतिसादवरून लोकांमध्ये किती असंतोष आहे हे स्पष्ट होते .
**दत्तात्रय पा . कावडे, मनसे तालुका अध्यक्ष, धर्माबाद**



**कन्नड : झाडे लावा झाडे जगवा कन्नड तालुका अखील भारतीय ग्राहक पंचायत यांच्या वतीने हरी किशन नगर मक्रणपूर कन्नड बायपास येथे 350 वृक्षारोपण करण्यात आले त्या झाडेची संगोपण करण्याची जाबाबदारी देखील घेतली. यावेळेस अखिल भारतीय ग्राहक पंचायत कन्नड़ तालुका अध्यक्ष रोहित पिरथानी,अक्षय अग्रवाल,धीरज चव्हाण, बाळू साबळे, नंदू शेजवळ, सुनील गंगवाल, आथर भाईजी, रुपेश भारुका व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# मेंढीचराईसाठी राज्यव्यापी आंदोलन छेडणार

## सिल्लोड येथील बैठकीत लहुजी शेवाळे यांची घोषणा



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील अजिंठा, सोयगाव, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर वनक्षेत्र परिसरात व बुलढाणा, नाशिक, जळगाव, धुळे, अकोला जिल्ह्यातील वनविभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांकडुन मेंढपाळांचा अतोनात छळ करुन पिळवणूक करण्यात येत असून मेंढीचराईकरिता राज्यस्तरीय धोरणात्मक निर्णय घेण्यात येवून मेंढपाळांना कायमस्वरूपी दिलासा मिळावा या करिता राज्यव्यापी आंदोलन छेडण्याची घोषणा जय मल्हार सेनेचे सरसेनापती लहुजी शेवाळे यांनी केली. सिल्लोड येथील शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित धनगर समाज बैठकीत ते बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक सुनील दुधे हे होते. राज्यातील धनगर समाजाचे अनेक प्रश्न राज्यकर्त्यांच्या उदासीनतेमुळे कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहेत. धनगर एस टी आरक्षण, मेंढ्यांच्या विमा काढणे, मेंढपाळांवरील गुन्हे काढणे,स्वसंरक्षणासाठी बंदुकीचा परवाना देणे, धनगर समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना अर्थ सहाय्य मिळण्यासाठी मल्हारराव होळकर आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती करणे इत्यादी मागण्यासाठी धनगर समाजाने रस्त्यावर उतरून आक्रमक पवित्रा घेतला पाहिजे असे आवाहन उपस्थितीना करून श्री शेवाळे म्हणाले जय मल्हार सेनेच्या वतीने पुढील महिनाभर राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार असून राज्यातील धनगर समाज बाधवांनी या निर्णायक लढाई पुर्ण ताकदीने उतरावे असे आवाहन केले. याप्रसंगी मा.प्रा.गोविंदराव भोजने, पांडुरंग दुधे, माणिकराव राऊत, गयाबाई सावळे, माधव जाधव, विठ्ठल रांधवन, देविदास दांगोडे,गजानन साबळे, कारभारी दांगोडे, शिवाजी काटकर, सुनील दुधे ,श [10/07, 08:11] Lahu Shewale: श्रावण हासे,सौ.सिंधुताई चोरमारे, सुर्यभान सोनवणे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. हिरामण दुधे यांनी तर आभार प्रदर्शन दिगंबर गोरे यांनी केले.

बैठकीला मिठाराम ठेलारी, सोपान भांड, भगवान कोळेकर, उमा येळे, नाना करनर, सयाजी गोरे, मारोती ढेपले, मधुकर हासे, हरी बनसोड, विठ्ठल ढेपले, ईश्वर कोळेकर, नाना येळे, बाळू शिंदे, सुभाष साबळे, मधुकर खंबाट, रखमाजी जाधव, परमेश्वर काटकर,संतोष दांगोडे, नारायण ढेपले ह मोठ्या प्रमाणात धनगर समाज बांधव व मेंढपाळ उपस्थित होते.

# जनतेसाठी मा.आ. विजय भांबळे यांनी घेतली तहसीलदार यांच्या दालनात बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** सर्व सामान्य नागरिकांची कामे तात्काळ मार्गी लावा यासाठी मा.आ.विजयराव भांबळे यांनी श्री. सरोदे तहसीलदार यांच्या दालनात विविध विषयावर बैठक घेतली व सर्व विषय तात्काळ मार्गी लावावेत आशा सूचना दिल्या.

जिंतूर तालुक्यातील सर्व समान्य नागरिकांची कामे बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असून त्यात विद्यार्थी यांचे उत्पन्न प्रमाणपत्र, ई डब्ल्यू एस, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर व विविध प्रमाणपत्रे तात्काळ निर्गमित करणे, अनेक शेतरस्ते, शिवरस्ते व पांदन रस्ते लोकांनी अतिक्रमण करून बंद केल्याने अनेक शेतकऱ्यांना शेतात जाण्यास त्रास होत आहे. राष्ट्रीय अर्थसाह्य योजना, नैसर्गिक आपत्ती मधील अनुदान तसेच श्रावण बाळ व विविध अनुदान योजनेचे प्रश्न तसेच अपंग व्यक्तींना अंत्योदय योजनेचे राशन कार्ड, इतर राशन कार्ड अनेक दिवसापासून तहसील कार्यालयात प्रलंबित आहेत. या सर्व समस्या घेऊन मा.आ.विजयराव भांबळे यांनी तहसीलदार श्री सरोदे यांच्याशी त्यांच्या दालनात बैठक घेऊन विविध विषयावर चर्चा करून नागरिकांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. सदरील बैठकीत 13 पेक्षा जास्त गावातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी बैठकीस प्रसादराव बुधवंत, रामराव उबाळे, मनोज थिटे, गणेशराव इलग, मधुकर भवाळे, संजय निकाळजे, चंद्रकांत बहिरट, विजय वाकळे, दत्तराव नवले, परमेश्वर ढोणे, खुशाल चीभडे, शिवजी ढवळे, श्याम सारंग, पंडित जाधव, गंगाधरआप्पा तरटे, गजानन कुटे, शंकर माणे, जलील इनामदार, बबलू कदम, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.





|| नमो ||
शुभ कार्य तुमचे व्यवस्था आमची
विनोद मंडप
डेकोरेटर्स अँड केटरर्स
लग्न, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, वास्तूशांती, शुभ कार्याच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.
प्रो.प्रा. विनोद जोगदंडे
9158500727, 8446185722
टाऊन हॉल, व्हीआयपी रोड, छत्रपती संभाजीगर

# घनसावंगीचे मॉडेल कॉलेज राज्यात आदर्श ठरेल : प्राचार्य डॉ. दांडगे

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** भारत सरकारने 2011 मध्ये देशात 374 मॉडेल कॉलेजला मान्यता दिली असून त्यामध्ये महाराष्टात 7 कॉलेज पैकी मराठवाड्यात जालना जिल्ह्यातील घनसावंगी व हिंगोली साठी असे दोन मॉडेल कॉलेजला मंजुरी देण्यात आली. शैक्षणिक बाबतीत मागासलेल्या घनसावंगी तालुक्यासाठी मॉडेल कॉलेज एका मार्केट कमिटीच्या कार्यालयात सुरु करण्यात आले ते 2015 पर्यन्त त्यानंतर शासनाकडून राजेगाव रोडवरती या कॉलेजची प्रशस्त इमारत उभी राहिली व खऱ्या अर्थाने शैक्षणिक बाबतीत घनसावंगी तालुक्याला दिलासा मिळाला कारण या कॉलेज ने शैक्षणिक क्षेत्रात हळूहळू प्रगती करत योग्य दिशेने पाऊल उचलण्यास सुरुवात केली. सुरुवातीला विध्यार्थी प्रवेश मिळविण्यासाठी कॉलेज प्रशासनास मोठी मेहनत घ्यावी लागली परंतु आजरोजी प्रवेशासाठी वेटिंग वर विध्यार्थी थांबत आहेत.आणी याचे सर्व श्रेय प्राचार्य डॉ.सतिष दांडगे व सर्वच प्राध्यापक आणी कॉलेज प्रशासनाचे असल्याचे दिसून येते.तसेच मॉडेल कॉलेज मध्ये कॉम्पुटर सायन्स,बायो टेक्नोलॉजी व बायो केमीस्ट्री हे तीन कोर्स सुरु झाल्याने ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण मिळत असल्याने या महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी विध्यार्थी व पालक धडपड करताना दिसत आहेत. याविषयी मॉडेल कॉलेजचे प्राचार्य डॉ.सतिष दांडगे यांनी सांगितले की घनसावंगीचे मॉडेल कॉलेज महाराष्ट्र राज्यातील मॉडेल 7 कॉलेज पैकी सर्वच बाबतीत टॉप वर असून मी या कॉलेजच्या प्राचार्य पदी आहे तोपर्यंत हे कॉलेज राज्यात एक



उत्कृष्ट शैक्षणिक आदर्श निर्माण करेल व या कॉलेज मधून घडलेला विध्यार्थी आपल्याला करियर मध्ये नक्कीच उज्वल होईल तसेच हे मॉडेल कॉलेज लवकरच एक राष्ट्रीय वर्कशॉप आयोजित करून देशातील 374 मॉडेल कॉलेज एकत्र बोलावून आणखी भरारी घेईल व वर्षातून दोन ते तीन वेळेस कॅम्पस इंटरव्यू च्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थी वेगवेगळ्या पदावर सफल होत आहेत स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुद्धा सुरू करण्यात येईल वाणिज्य विभाग तसेच भाषा प्रयोगशाळा सुसज्ज ग्रंथालय आणि परिपूर्ण भौतिक सुविधांनी परिपूर्ण असे हे महाराष्ट्रातील महाविद्यालय असेल येणाऱ्या काळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख विविध कोर्सेस शॉर्ट टर्म कोर्सेस सुरू करण्यात येतील. सुसज्ज मैदान शारीरिक कवायती तसेच पोलीस भरती व इतर भरतीच्या तयारीसाठी करण्यात येत आहे. सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वांव मिळत आहे. रोजगारक्षम अभ्यासक्रम तसेच नवीन शैक्षणिक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा ची अंमलबजावणी करणारा अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहे माननीय कुलगुरू डॉक्टर प्रमोद येवले यांच्या मार्गदर्शनाखाली मॉडेल कॉलेज हे महाराष्ट्रातील एक आदर्श कॉलेज ठरणार आहे असे प्राचार्य डॉ.सतिष दांडगे यांनी सांगितले.

**महाविद्यालयाला लवकरच मिळणार नवीन सुविधा :** *100मुलासाठि व 100 मुलींसाठी दोन स्वतंत्र वस्तीग्रह *कॉलेजच्या कॅम्पस मध्ये लवकरच इंटरनेट सेवा उपलब्ध होणार . *लायब्ररी साठी नवीन अडीच ते तीन लाखाची नवीन पुस्तके खरेदी केली आहे . *लवकरच कॉलेजच्या कॅम्पस मध्ये स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करणार असल्याची संकल्पना आहे *आतापर्यंत 42 लाखाचे साहित्य कॉलेजला उपलब्ध झालेले आहे . * सौर ऊर्जेच्या माध्यमातून महाविद्यालयाला वीज पुरवठा

# वैजापूर येथे अखंड हरिनाम सप्ताह कार्यालयाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज




**वैजापूर :** पुढील महिन्याच्या २१ऑगस्ट ,२०२३ पासून सुरू होणाऱ्या सदगुरू गंगागिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताह च्या कामकाजाचे नियोजन साठी रविवार( ता.०९ ) रोजी कार्यालय शुभारंभ सराला बेट गोदा धामचे मठाधिपती हभप रामगिरी जी महाराज यांच्या हस्ते झाले,त्यांनी विशद केले की,हा १७६ वा सप्ताह सर्वधर्म समभावाची आदर्श प्रतिमा होय, शहर व तालुक्यातील सर्व जाती,धर्म,पंथ व समुदाय च्या नागरिकांनी यात सहभागी होऊन सामाजिक नैतिक मूल्ये ,मानवीय मूल्ये जपावी असे आवाहन हभप रामगिरी जी महाराज यानी उपस्थित भक्त भाविकांना केले. उभारले अन्न छत्र -सर्व केले एकत्र या उक्तीप्रमाणे सर्वानी या साप्ताहाला यावे असे महाराज म्हणाले, आरंभी कार्यलय शुभारंभ, कार्यक्रम दैनंदिनी, नोंदणी प्रमाण पत्र, वर्गणी पुस्तिका , दररोज पंगत पत्रक अशा सर्व बाबींचे पूजन करून श्रीफळ फोडले,सप्ताह समितीच्या वतीने महाराजांचे सर्वांनी पूजन केले,आ,रमेश पा,बोरनारे, डॉ. दिनेश परदेशी, आ,प्रा,रमेश पा,बोरनारे यांनी मनोगत व्यक्त केले,सूत्र संचलन व आभार धोंडीरामसिंह राजपूत यांनी मानले,या प्रसंगी बाळासाहेब संचेती, ऍड, प्रतापराव निंबाळकर, एकनाथ जाधव,कल्याण दागोडे,कडूभाऊ हिवाळे, बाबासाहेब जगताप, अविनाश गलांडे,देविदास वाणी, आनंदीताई अन्नदाते,सुलभा भोपळे, श्रीमती पद्मा साळुंके,खुशालसिंह अंकल, दिनेश राजपूत, यांच्या सह भक्त भाविक मोठ्या संखेने उपस्थित होते.

# ख्रिश्चन धर्मामध्ये मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पिंपरी-चिंचवडमधील रहाटणी येथे धर्मांतराबद्दल मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात तीन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी वाकड पोलिसांनी तीनही महिलांना नोटीस बजावत समज दिली आहे. बायबल वाचा, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा असे म्हणून ३९ वर्षीय तक्रारदार यांना विश्वासात घेऊन धर्मांतर करण्याचा प्रयत्न तीन महिलांनी केला असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३९ वर्षीय तक्रारदार यांच्या घरी तीन महिला वारंवार येऊन तुम्ही येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा असे म्हणून बायबल वाचून दाखवत होत्या. याबाबत अनेकदा तक्रारदार महिलेने आम्हाला हे काही समजत नाही. आम्हाला या गोष्टीमध्ये पडायचं नाही असं समजावून सांगितलं होत. सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास तीनही महिला तक्रारदार यांच्या घरी बळजबरीने शिरल्या, त्यांनी तक्रारदार यांना पुन्हा अशाच प्रकारची बळजबरी करत येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यास सांगत मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. हे सर्व सुरू असताना तक्रारदार यांनी संबंधित तीनही महिलांना बाहेर जाण्यास सांगितलं. परंतु, त्या बाहेर जात नव्हत्या, अखेर त्यांच्या पुतण्याला बोलवून घेऊन महिलांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. तरीही त्या जात नसल्याने अखेर पोलिसांना बोलावण्यात आलं. संबंधित महिलांबाबत वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महावितरणने वीज पुरवठा केला सुरळीत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे महावितरण कंपनीचे ३३ केव्ही उपकेंद्र असून या उपकेंद्राला पंचवीस ते तीस गावे जोडण्यात आले आहे. परंतू या महावितरण उपकेंद्राला बराऱ्याच वेळी लाईन फालटी होते.परंतु दैनिक आधुनिक केसरी मधे बातमी येताच उपकार्यकारी अभियंता निरज बिदे सोयगाव यांनी तातडीने दखल घेऊन दोन दिवस विद्दुत पुरवठा खंडीत असलेला सुरळीतपणे चालू केला आहे.

उपसणाला बसणार असे लेखी निवेदन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या दिले होते.सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात दुर्गम ग्रामीण भागातील असलेली गावे असा सुमारे अठरा ते वीस गावांचा वीज पुरवठा गेल्या दोन दिवसांपासून काही कारण नसताना खंडित झाल्याने वीज ग्राहक पुरते हैराण झाले आहेत. दरवर्षी सावळदबारा महावितरणचे दुर्लक्ष होत असल्याने अशा प्रकारे अनेक दिवस वीज प्रवाह खंडित होत असतो, असा आरोप सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केला होता.



वाघजाळ फाट्यावरून येणारी ३३ केव्ही उपकेंद्राची सावळदबारा येणारी लाईट ही ५० किलोमीटर येत असल्याने अतंर जास्त आहे आणि २५०० हजार ईन्सलेटर आहे त्यामध्ये पावसाळ्यात झाडांच्या फांद्या लागल्याने घसरण होऊन स्फोट होतो . लाईट बंद होऊन जाते आमच्या कर्मचाऱ्यांना प्रत्येक इन्सूलेटर चेक करता करता सहज आठ ते दहा तास लागतात आम्ही पाडळी येथून शुद्धा लाईट घेणार होतो . परंतु ती अगोदरच ओरफुल असल्याने घेता येत नाही मी प्रत्यक्ष डोंगरातून पायी जाऊन बघून आलो आहे .आम्ही लाईटचा ग्राहकांना त्रास होऊ देणार नाही याची काळजी घेऊन लाईट सुरळीत करून देत राहणार आमच्या महावितरण कंपनीला रोहिणखेड जंगलातील वनपरिक्षेत्र अधिकारी झाडे काटू देत नाही फक्त फांद्या काटाव्या लागतात सहा महिन्यांत पुन्हा फांद्या मोठ्या होऊन ईन्सूलेटर लागतात म्हणून हे प्रॉब्लोम होतात महावितरण कंपलीला सहकार्य करावे .
**निरज बिदे, उपकार्यकारी अभियंता, सोयगाव सावळदबारा**

# कष्टकरी बिडी कामगारांना दिलासा

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** येथे कार्यरत असलेल्या ठाकुर सावदेकर आणि कंपनी येथे बिडी उत्पादनाचे काम चालते येथे सुमारे 250 पेक्षा जास्त कामगार बिडी बनवण्याचे काम करतात या पैकी फक्त काही कामगारांनाच पी फ चे अंशदान चालू होते. व 78 कामगारांच्या पी फ च्या बाबतीत कायद्यानुसार लागु असलेले नियम, फायदे , लाभां पासून वंचित ठेवले होते. ही बाब महाराष्ट्र राज्य बिडी कामगार संघाच्या (संलग्न भारतीय मजदूर संघ) च्या निदर्शनास आली. ही बाब संघटनेने कंपनी व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून दिले पण या बाबतीत व्यवस्थापनाने कोणतेही दखल घेतली नाही त्यामुळे दि 29/06/2021 रोजी पी फ कमिशनर ऑफिस पुणे् येथे तक्रार दाखल करून एप्रिल 2016 ते डिसेंबर 2021 या कालावधीतील 78 कामगारांची पी फ रक्कम भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 अन्वये कायदेशीर कारवाई करून कामगारांना न्याय द्यावा अशी मागणी केली. या बाबतीत पी फ कमिशनर ऑफिस पुणे ने दखल घेऊन श्री के. भानुप्रकाश व श्री संजय कोहाड यांची अंमलबजावणी अधिकारी म्हणून नेमणूक केली. त्यांनी व्यवस्थापन व संबंधीत कामगारांच्या कागदपत्रे, पुरावे यांची छाननी करून त्याचा अवहाल श्री योगेद्र सिंग शेखावत क्षत्रिय भविष्य निर्वाह आयुक्त पुणे 2 यांना सादर केला.

या बाबतीत त्यांनी दि 28/06/2023 भविष्य निर्वाह निधी कायदातील तरतूदी नुसार 7 ऐ नुसार 17 लाख 33 हजार ऐकशे सात रू नियोक्ता कडून देय रक्कम निश्चीत केली. या शिवाय 7 क्यूं नुसार व्याज व 14 बी नुसार दंड करून सर्व रक्कम 45 दिवसांत जमा करण्यासाठी आदेश दिले आहेत.

या संपूर्ण प्रकरणात भारतीय मजदूर संघाचे सेक्रेटरी उमेश विस्वाद यांनी बिडी कामगारांची बाजु मांडून असंघीटत क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा मिळविण्यासाठी विविध ऊद्योगात प्रवास करून कामगारांना न्याय मिळवून देऊ असे बिडी कामगारांच्या झालेल्या मिटींग मधे सांगितले आहे.




# अधिकारी संघटना पतसंस्थेची सभा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटना पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ९ जुलै रोजी उत्साहात पार पडली.

सभेत संचालक मंडळाने सादर केलेला १० टक्के लाभांशाचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. पतसंस्थेच्या इमारतीसाठी निधी जमा करणे, कर्जदारांना कर्जाच्या रकमेवर विमा बंधनकारक करणे, नवीन संचालक निवडणे या विषयांवरही सभेत साधकबाधक चर्चा करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या सभागृहात झालेल्या या सभेस पतसंस्थेचे अध्यक्ष अनंत कोंत, सचिव दिलीप पवार, कोषाध्यक्ष हणमंत गायकवाड, अधिकारी संघटनेचे अध्यक्ष प्रवीण बागुल, सरचिटणीस संजय खाडे, केंद्रीय सल्लागार गुलाबराव मानेकर, संचालक प्रमोद राजेभोसले, तज्ज्ञ संचालक सतीश तळणीकर यांच्यासह संचालक मंडळाची प्रमुख उपस्थिती होती. सभेसाठी संघटनेचे उपसरचिटणीस प्रणेश सिरसाठ, सचिव गणेश बोढरे, मंजूषा दुसाने, नितीन पारिपेल्ली, डॉ.शिवाजी तिकांडे, पतसंस्थेचे कर्मचारी शिंदे, शित्रे व महावितरण-महापारेषणच्या औरंगाबाद परिमंडल कार्यकारिणीने परिश्रम घेतले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद


# लाडगाव प्रवेशद्वाराजवळ जीवघेणा खड्डा

## खड्डा तत्काळ बुजवण्यात यावा : धोंडीरामसिंह राजपूत

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** नाशिक-निर्मल राष्ट्रीय महामार्ग लगत लाडगाव प्रवेश द्वारजवळ मोठा खड्डागेल्या एक महिन्यापासून नाशिक -निर्मल महामार्ग वर लाडगाव प्रवेश द्वार जवळ मधोमध खूप मोठा खड्डा आहे,परंतु याकडे कुणाचेही लक्ष नाही,एखादा मोठा अपघात होऊन काही लोक मेल्यावर हा रस्ता दुरुस्त होण्याची वाट तर संबंधित बघत नाही ना ?हा रस्ता ज्या कुणाच्या अखत्यारीत येत असेल त्यांनी दुरुस्त करावा,सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा नगर पालिका यांनी आपसात समनवयात्मक चर्चा करावी व लवकरात लवकर वाद मिटऊन हा खड्डा दुरुस्त करावा, या रस्त्यावर वाहतूक खूप असते,एका तरुण महिलेला आपला जीव गमवावा लागला,अनेक नागरिकां या खड्या मुळे अपघात झाले ते अधु होऊन घरात पडलेले आहेत,आणखी जीव जावा किंवा येथे अपघात व्हावे असे वाटत असेल तर हे वैजापूर करांचे दुर्दैव म्हणावे लागेल, ह्या खड्डा तात्काळ बुजवण्यात यावा अशी मागणी सेवानिवृत्त धोंडीरामसिंह राजपूत, वैजापूर यांनी केली आहे.

# गोपाळ वर्तक यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रायगड जिल्ह्यातील उरण पूर्व विभागातील प्रसिद्ध निवेदक आणि सामाजिक कार्यकर्ते सुनिल वर्तक यांचे वडील, गोवठणे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच स्वर्गीय गोपाळ आलोजी वर्तक ऊर्फ आप्पा यांच्या स्मृती दिनानिमित्त गोवठणे विकास मंच आणि समर्पण ब्लड सेंटर यांच्या सौजन्याने भव्य रक्तदान शिबिर रविवार दिनांक ९ जुलै २०२३ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत पारधे, नरेश शेंडे, संतोष थळे मुंबई,माजी उपसरपंच विक्रांत वर्तक,समीर म्हात्रे, साईकृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी चे राकेश पाटील,श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश म्हात्रे,कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, पत्रकार नंदकुमार तांडेल, सीएचए संघटनेचे अध्यक्ष रुपेश भगत, सुषमा म्हात्रे, निगा फाउंडेशनचे निलेश गावंड, प्रा.शिक्षक अजित जोशी यांसह रक्तदान चळवळीत सक्रीय संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी व उरण तालुक्यातील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. सुनील वर्तक यांनी आरोग्य क्षेत्रातील होत चाललेला रक्ताचा तुटवडा, रक्ताची वाढती मागणी, ईमरजन्सी च्या वेळेत रक्ताचा होत असलेला अपुरा रक्त पुरवठा, रक्त वेळेत न मिळाल्यानेहोणारे मृत्यू आदी गोष्टींचा विचार करून रक्तदान शिबिराचे आयोजन आले होते.

# सोयगावात बाजरीच्या नवीन वाणाची शेतीशाळेच्या माध्यमातून जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी विभागाच्या वतीने दिनांक ११\०७\२०२३ रोजी बी.एस.तौर प्रकल्प संचालक आत्मा, औरंगाबाद व अनिल कुलकर्णी प्रकल्प उपसंचालक आत्मा, औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे जंगलीकोठा ता.सोयगाव येथे आत्मा अंतर्गत बाजरी पिक शेतीशाळा वर्ग २ घेण्यात आला.

आजच्या शेतीशाळा वर्गात जैविक बिजप्रक्रिया, बाजरी पिकाचे मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांचेकडील विकसीत वाण ए.एच.बी १२०० ( बायोफोर्टीफाईड वाण ) यांचे गुणधर्म सांगून दोन शेतकरी लाभार्थी यांना प्रात्यक्षिक क्षेत्रासाठी बियाणे देण्यात आले तसेच लागवड विषयी मार्गदर्शन ए.एस.महाजन बी.टी.एम.सोयगाव व बी.ए.वायकर कृषी सहाय्यक यांचे मार्फत करण्यात आले व किसन धनाजी कोलते ( रिसोर्स बँक फार्मर ) यांनी बाजरी पिक लागवड करत असतांना द्यावयाची खत मात्रा याविषयी सोप्या भाषेत माहिती दिली. सदर कार्यक्रमास उपसरपंच, महिला प्रगतीशील शेतकरी, तसेच लोकप्रतीनीधी यांची उपस्थिती होती. आजच्या कार्यक्रमाचे आयोजन रंजना भोजने समुह संसाधन व्यक्ती यांचे मार्फत करण्यात आले.



# येसगाव ग्रामपंचायत अंतर्गत चालू असलेल्या जनहित कामासाठी दोन लाख आठ हजार पाचशेंचा धनादेश

आधुनिक केसरी न्यूज

**येसगाव :** मिशन 500 पाच पाटील टीम चाळीसगाव व EWT-MSCDA अंतर्गत नाला खोलीकर, बांध बंदिस्ती, गाळ टाकणे, चर मारणे *अखिल भारतीय तथा महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष केमिस्ट हृदयसम्राट आदरणीय जगन्नाथजी शिंदे ( आप्पासाहेब )यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून स्थापन केलेल्या Educational Welfare Trust of M.S.C.D.A च्या माध्यामातून औरंगाबाद जिल्हयातील येसगाव ग्रामपंचायत अंतर्गत चालू असलेल्या जनहित सामाजिक कामासाठी मदत म्हणून रुपये 2 लाख 8 हजार पाचशे इतक्या रकमेचा धनादेश तेथील संस्थेस हस्तांतरित करण्यात आला. त्याकरिता तेथे एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येसगाव येथील सरपंच श्री योगेश भाऊ काळे व जे. सी. बी मालक श्री अजय चव्हाण यांना दानादेश देण्यात आला, यावेळी ग्रामस्थ उपस्थित अतिथी सर्व होते औरंगाबाद जिल्हा केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी नितीन देशमुख अध्यक्ष विनोद लोहाडे सचिव नंदकिशोर काळे 'उपाध्यक्ष ( शहर ), सागर पाटील उपाध्यक्ष ( ग्रामीण ), निखिल सारडा - कोषाध्यक्ष, सुनील देशमुख- सह सचिव ( ग्रामीण ), किरण जोशी सह सचिव ( शहर ), कार्यकारणी सदस्य बाबुराव सोनवणे, वसंत भराड, कपिल तिबडीवाल आणि रईस शेखसदस्य अजय काळे,गजानन खंडागळे, शंकर खंडागळे, कृष्णा काळे, विनोद काळे,सुनील नरवडे व ग्रामस्थ उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# बंद कंपनी सुरु करण्यात यश !

## कामगार नेते महेंद्रजी घरत यांची जादुई मध्यस्थी!

आधुनिक केसरी न्यूज

**विठ्ठल ममताबादे**

**उरण :** इसांबे ता. खालापूर येथील मे. डि. एस.व्ही. केमिकल्स ही कंपनी मागील नऊ महिन्यांपासून बंद होती. बळवंतराव पवार यांची कामगार संघटना व व्यवस्थापन यांच्यात पगारवाढीची चर्चा असफल झाल्यामुळे कामगारांनी कामबंद केले होते. नऊ महिने कंपनी बंद असल्यामुळे पगार नाही, कामगारांना उत्पन्न नाही त्यामुळे कामगार अस्वस्थ झाले व कामगारांनी कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांची भेट घेऊन आपण कंपनी सुरु करण्यासाठी आम्हांस सहकार्य करावे अशी विनंती केली.

कामगारांना न्याय देण्यासाठी नेहमीच अग्रेसर असणारे कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी आपल्या कामगार क्षेत्रातील अनुभवाने, कंपनी व्यवस्थापनाबरोबर वाटाघाटी करून बंद कंपनीतील कामगारांना ७००० रुपये पगारवाढ करण्याचा करार दि. १० जुलै २०२३ रोजी केला व १२ जुलै पासून हि कंपनी पूर्ववत सुरु होत आहे. कामगार नेते महेंद्र घरत यांच्या जादुई मध्यस्थीने ५२ कामगारांचा रोजीरोटीचा प्रश्न मार्गी



लागला यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होऊन कामगारांनी कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचे मनापासून आभार मानले. कामगारांना ७००० रुपये पगारवाढ, १६८०० रुपये बोनस, परीवारासाठी मेडिक्लेम सुविधा देण्याचा करार दि. १० जुलै २०२३ रोजी करण्यात आला. या प्रसंगी न्यु मॅरीटाईम ॲण्ड जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते महेंद्रशेठ घरत, सरचिटणीस वैभव पाटील, व्यवस्थापनातर्फे डायरेक्टर धनंजय साठे, गौरव साठे, फॅक्ट्री मॅनेजर प्रशांत मानकामे, कायदेशीर सल्लागार सईद मुल्ला, असीफ मुल्ला, मनीष धुतीया तर कामगार प्रतिनिधी राकेश पाटील, दिपक देवघरे, संजय देवघरे, ज्ञानेश्वर तेलंगे, मधुकर शिंदे, मनोहर देवघरे, उपस्थित होते.

# काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी दंडवे तर युवक काँग्रेस अध्यक्षपदी अत्रिक पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील अनेक दिवसापासून काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष निवडीबाबत





चर्चा होती.माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सर्व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन अखेर सोमवारी भगवान दंडवे याची तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी तर युवक काँग्रेस तालुका अध्यक्षपदी अत्रिक पाटील मुंगल यांची निवड घोषित केली आहे. शहरात कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा केला आहे. तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी कुणाची वर्णी लागेल याची उत्सुकता लागून होती. आखेर सोमवारी पाळज ( ता.भोकर ) येथे काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष अमर राजूरकर यांनी निवडीचे पत्र दिले आहे. यावेळी सभापती जगदीश पाटील भोसीकर, माजी जिल्हा परिषद सभापती बाळासाहेब रावणगावकर,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगाराणीताई अंबुलगेकर, प्रकाश देशमुख भोसीकर, गोविंद बाबा गौड, रामचंद्र मुसळे, पप्पू पाटील कोंडेकर, मारुती पाटील शंख तीर्थकर, कविताताई कळसकर, अनिता इंगोले, विनोद पाटील चिंचाळकर, मनोज गीमेकर, केशव पाटील, मिर्झा ताहेर बेग, आदिनाथ चिंताकुटे, आदींची उपस्थिती होती. शहरातील आंबेडकर चौकात फटाके वाजवून स्वागत करण्यात आले. यावेळी मोबीन खान मौलाना, बाबुराव आंदबोरीकर, श्रीकांत दरबस्तवार, विक्रम क्षीरसागर, विठ्ठल धोंडगे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील भगवानगड ट्रस्ट, मेहेगाव यांच्या वतीने देण्यात येणारा समाजभूषण पुरस्कार



शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले यांना जाहिर करण्यात आला आहे. कन्नड तालुक्यातील मेहेगाव पंचक्रोशी येथे भव्य भगवानगड आहे. येथे सातत्याने अध्यात्मिक, सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येते, येत्या१५ जुलै रोजी दुपारी ३ वा. केंद्रिय अर्थ राज्य मंत्री मा.ना. डॉ. भागवतजी कराड यांच्या विशेष उपस्थितीत, ज्येष्ठ साहित्यिक मा. श्री. बाबा भांड यांच्या अध्यक्षतेखाली समाजभूषण पुरकाराचे वितरण होणार आहे. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. श्याम शिरसाठ, मा. विभागीय आयुक्त भास्करराव मुंढे, साहित्यिक व मुख्य अभियंता महावितरण चे डॉ. मुरहरी केळे, ह.भ.प.डॉ. सुदाम महाराज पानेगावकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये नावलौकिक शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथे कार्यरत असणारे उपक्रमशील आणि विकासाभिमुख प्राचार्य डॉ. विजय एन.भोसले सर. कन्नड तालुक्यातील विद्यार्थी सर्व स्पर्धेत टिकला पाहिजे, यासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम ते राबवत असतात, वक्तृत्व स्पर्धा, वाद -विवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा, व्यक्तिमत्व विकास, रोजगार मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करतात. त्यामुळे महाविद्यालयाला तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्र आणि विद्यापीठ स्तरावरील शेकडो पुरस्कार प्राप्त झाले आहेत. महाविद्यालय बरोबरचं तालुक्यातील जनतेसाठी त्यांनी जनजागृतीचे कृतीयुक्त कार्यक्रम हाती घेतले आहेत, शेतीप्रश्न व शेती समस्यांचे गाभिर्य शासनापर्यंत पोहोचले पाहिजे, यासाठी प्रत्येक ग्रामपंचायती मार्फत महाराष्ट्र शासनाला निवेदन देण्याची मोहिम त्यांनी यशस्वीपणे राबवली आहे. तसेच महाविद्यालयात, कृषी मंच / ॲग्रो फोरम ची स्थापना करून कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांना व्यासपीठ मिळवून दिले, या कृषी मंचाच्या वतीने विविध पिकांची माहिती, जल व्यवस्थापन, रोग नियंत्रण आणि नवीन तंत्रज्ञानची माहिती तालुक्यातील शेतकऱ्यांना दिली जाते, आज पर्यंत या मंचाच्या वतिने विविध शेतीविषयक तज्ञांची 60 पेक्षा अधिक व्याख्याने आयेजित केली. याशिवाय सांस्कृतिक महोत्सव, कविता महोत्सव साहित्य संमेलनाच्या आयोजनामध्ये त्यांचा विशेष पुढाकार असतो. तालुक्यातील विविध गावे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दत्तक घेतले, त्या ठिकाणी पाझर तलाव,बंधारे आणि वृक्षरोपाचे कार्य केले आहे. याकार्याची दखल घेत, महाराष्ट्र शासनाचा महसूल व वन विभाग यांचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार,2018 चा जिल्हास्तरीवर प्रथम व राज्यावरील तृतिय पुरस्कार संस्थेला प्राप्त झाला आहे. 'गो फॉर इट' या गुपच्या माध्यमातूनही ते छत्रपती संभाजीनगर शहर व परिसरातील विविध टेकड्या व डोंगरावर वृक्षारोपण व पर्यावरणाचे संवर्धन करत आहेत. तसेच गड किल्ल्याचे संवर्धन झाले पाहिजे, यासाठी ते ग्रुपच्या माध्यमातून जनजागृती करत आहेत. सर्व शैक्षणिक, सामाजिक, कृषी , साहित्य आणि पर्यावरण विषयक कार्य, कर्तृत्व व योगदानाची दखल घेत, भगवानगड ट्रस्ट, मेहेगाव यांनी समाजभूषण पुरस्कारची घोषित केला आहे.

# दिशाहीन राजकारणात काँग्रेसची नौका स्थिर

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** देशासह राज्या राज्यात अनेक पक्षातील मोठ मोठाले गट सत्तेच्या आमीशाला बळी पडुन फुटले मात्र या दिशाहिन राजकिय स्तीतीथ काँग्रेस पक्षाची नौका भक्कम व स्थिर असल्याचे प्रतिपादन युवक काँग्रेसचे कुणाल राऊत यांनी केले.

युवक काँग्रेसच्या पुढाकारणे मा.आ. सुरेशकुमार जेथलिया यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार दि. 10 जुलै रोजी परतुर येथील गजानन लॉन्स येथे आयोजीत युवक काँग्रेसच्या युवा संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर युवक काँग्रेसचे निमंत्रीत जम्मु प्रदेशचे संपर्कनेते उदयभान चिभ, आ. राजेश राठोड, अक्षय गोरंट्याल मराठवाड्याचे सर्व युवक काँग्रेसचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी आपल्या मार्गदर्शनपर मानोगतात विशाल पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकीय परस्तीतीचा समाचार घेत म्हटले की, आज अनेक पक्षातील गट बाजुला पडत सत्तेच्या लाटेत मतलबी वृत्तीमुळे दाखल होत आहे. यामुळे त्यांना मतदान करणारे व त्यांच्या विचारांना समर्थन देणारे मतदार संभ्रम अवस्थेत दिसत आहेत त्याना निवडून दिले तेच बैमान होत असेल तर विश्वास कुणावर ठेवायचा असा प्रश्न अनेक मतदारांना सतावत आहे. यावेळी राज्यातील मतदार केवळ काँग्रेस पक्षावर भरोसा ठेवुन असुन अनेक जन फुटले मात्र काँग्रेस पक्षातील एकही नेता सत्तेचा अमिशला बळी पडला नाही. उलट या वातावरणामुळे कॉग्रेसी विश्वासहर्ता अधिकचं बळकट झाली असल्याचे ते म्हणाले. आ. सुरेशकुमार जेथलिया यांनी म्हटले की जे गेले ते कधीचं पुन्हा आपले राजकीय अस्तीस्त उभा करू शकणार नाहीत. काँग्रेस देशातील सर्वांत जुना पक्ष असुन कॉग्रेस पक्षातील नेते मतदारांच्या विस्वास टिकवुण असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. आज राजकीय पटलावर नागरीक कॉग्रेसकडे मोठया आशेने पाहत असुन उदयाचा काळ आपलाचं आहे. कार्यकर्त्योंनी झटुन कामाला लागावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी जम्मु काश्मीरचे संपर्कनेते उदयभान यांनी आपल्या मनोगतात काँग्रेसच्या ध्येयधोरणाबाबत उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. राहुल गांधी हे देशाचे भविष्य असून या देशाचे भावी पंतप्रधान म्हणुन माहागाईने होरपळलेली जनता त्यांच्याकडे पाहत आहे.

# पुण्यात पत्नीशी अश्लील वर्तन केल्याने तरुणाचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पत्नीशी अश्लील वर्तन केल्याने तरुणाचा खून करणाऱ्या तरुणास बंडगार्डन पोलिसांनी अटक केली. पुणे स्टेशन परिसरात तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून करण्यात आल्याची घटना घडली होती. सूजरज आगवान ( वय ३५, मूळ रा. राजपूर, जि. कानपूर, उत्तरप्रदेश ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

गेल्या महिन्यात १४ जून रोजी पुणे स्टेशन परिसरातील रेल्वे वसाहतीजवळ एका तरुणाचा खून करण्यात आल्याची घटना घडली होती. मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून चेहरा दगडाने ठेचण्यात आला होता. बंडगार्डन पोलिसांनी खून प्रकरणाचा तपास सुरु केला होता. पोलिसांनी मालधक्का चौक परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण ताब्यात घेतले होते. मद्य विक्री दुकानाजवळ एक महिला आणि तरुण बोलत थांबल्याचे चित्रीकरणात आढळून आले होते.

# आजपासून गोंदिया जिल्ह्यात हेल्मेटसक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** अपघातांवर नियंत्रण मिळवण्यासाठी गोंदिया जिल्हा पोलीस प्रशासनाकडून आज, ११ जुलैपासून



हेल्मेटसक्ती लागू करण्यात आली आहे. पुढील तीन दिवस हेल्मेट न वापरणाऱ्यांचे समुपदेशन केले जाणार असून त्यानंतर मात्र दंडात्मक कारवाई केली जाईल. विशेष म्हणजे, हेल्मेट परिधान करून वाहन चालविणाऱ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले जाणार आहे.

व्यापारी व शहरवासियांना हेल्मेटसक्तीतून मुभा द्यावी, अशी विनंती जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली होती. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. दुचाकी चालवताना चालकांनी हेल्मेट वापरणे बंधनकारक आहे. केवळ कारवाई करणे हा आमचा उद्देश नसून दुचाकीचालकांची सुरक्षा हा मुख्य उद्देश आहे. दुचाकीचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे आणि पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक पोलीस विभागाकडून करण्यात आले आहे.

